# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, शुक्रवार, दिनांक ९ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३१७ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

### कुणाला घाम फुटणार


भाजपला रोखण्यासाठी सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. शेवटपर्यंत कुठल्याही पक्षात युती न झाल्याने सर्वच पक्षांनी आपले उमेदवार निवडणूक आखाड्यात उतरविले आहे. भाजपने देखील आपल्या निष्ठावान कार्यकर्त्यांना वगळून कालपरवा पक्षात आलेल्या उमेदवारांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे निष्ठावान नाराज झाले असून त्यांनी बंडखोरीचे दंड थोपटले आहेत. शहरात २८ ठिकाणी भाजपच्या बंडखोरांनी बंडखोरी केली आहे. त्यामुळे भाजपच्या अधिकृत उमेदवारांना निवडणुकीच्या आधीच घाम फुटला आहे. या बंडखोरांना रोखण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न करण्यात आले. परंतु, बंडखोरांनी कुणाचेही न ऐकता आपली उमेदवारी कायम ठेवली आहे. त्यातच अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडे उमेदवारच नसल्याने त्यांनी दुसऱ्या पक्षातील उमेदवारांना उमेदवारी दिली आहे. या पक्षाचे काही उमेदवार निवडून येतील मात्र, बहुतांश उमेदवार मते खाणार आहेत. त्यामुळे भाजपला कसे रोखणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेही भाजपचे उमेदवार विकासाच्या नावावर मते मागत आहेत. आम्ही हे आणल, आम्ही ते आणल. हे केल ते केल असे उमेदवारांना पटवून देत आहेत. त्यातच काही लोक या उमेदवारांकडे तक्रारींचा पाढा वाचत आहेत. या तक्रारी दूर करण्यासाठीच आम्ही तुमच्यापर्यंत आलो आहोत. आम्हाला निवडून आणा बघा कसा विकास करतो ते असे भाजपचे उमेदवार म्हणत आहेत. सर्वच पक्षाच्या उमेदवारांची खिचडी झाल्याने मतांची विभागणी होणार हे निश्चित मानल्या जाते. त्यामुळे हे पक्ष भाजपला कसे रोखणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यामुळे निवडणुकीनंतरच कोण कुणाला घाम फोडतो, कोण कुणाला रोखतो हे स्पष्ट होणार आहे.

## माधव गाडगीळ यांचे निधन

पुणे, दि. ८

भारताचे ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ञ, पश्चिम घाट समितीचे अध्यक्ष, विचारवंत आणि निसर्गप्रेमी डॉ. माधव गाडगीळ यांचे अल्प आजाराने निधन झाले.

वयाच्या ८३ व्या वर्षी त्यांनी पुण्यातील डॉ. शिरीष प्रयाग हॉस्पिटल येथे ७ जानेवारीला रात्री ११ वाजता शेवटचा श्वास घेतला. डॉ. गाडगीळ यांच्या निधनाने पर्यावरण, जैवविविधता आणि परिसंस्था संवर्धनासाठी आयुष्यभर झटणारा एक प्रखर आवाज, अभ्यासू मार्गदर्शक आणि संवेदनशील शास्त्रज्ञ देशाने गमावला आहे. डॉ. गाडगीळ हे भारतातील पर्यावरण शास्त्रांच्या श्रेणीतील एक अत्यंत मान्यवर नाव होते. पश्चिम घाटातील जैवविविधता निसर्ग संपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन आणि स्थानिक समुदायांच्या सहभागावर आधारित



विकासाचा त्यांनी सातत्याने आग्रह धरला.

### मुख्यमंत्र्यांना शोक

पर्यावरण संतुलनाच्या क्षेत्रासाठी आयुष्य वेचणारे डॉ. माधव गाडगीळ व्रतस्थ पर्यावरण शास्त्रज्ञ म्हणून सदैव स्मरणात राहतील, अशी शोकभावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पद्मभूषण डॉ माधव गाडगीळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# मुंबईत जन्माला येऊन म्हातारे झाले तरी विकास जमला नाही : देवेंद्र फडणवीस



### मी आता सर्टिफाईड नागपूरकर

राज ठाकरे यांच्या एका विधानाचा संदर्भ देत फडणवीस मिश्किलपणे म्हणाले की, राज ठाकरेंनी मला मुंबईच्या बाहेरच ठरवल्यामुळे मी आता अधिकृतपणे सर्टिफाईड नागपूरकर झालो आहे.'' आपल्या राजकीय प्रवासाचा उल्लेख करताना त्यांनी नागपूरच्या जनतेने दिलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

७०० हेक्टरवर वसणार न्यू नागपूर

नागपूरच्या भविष्याबद्दल घोषणा करताना फडणवीस म्हणाले की, नवीन तंत्रज्ञान आणि व्यवसाय आकर्षित करण्यासाठी नवीन शहराची गरज आहे. म्हणूनच शहराजवळ आम्ही ७०० हेक्टर जमिनीवर न्यू नागपूर तयार करणार आहोत. नवीन नागपूर आणि रिंग रोडसाठी तब्बल ११ हजार कोटी रुपये खर्च केले जात आहेत.

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

नागपूर, दि. ८

मी नगरसेवक होईल किंवा राजकारणात इतका पुढे जाईन, असं कधीच वाटलं नव्हतं; पण नागपूरकरांच्या आशीर्वादामुळे मी आमदार आणि मुख्यमंत्री कधी झालो हे समजलंही नाही. आज जे लोक मुंबईत जन्माला येऊन म्हातारे झाले, ते शहराचा विकास करू शकले नाहीत, ते आता काय विकास करणार? अशा बोचऱ्या शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज (दि. ८) विरोधकांचा समाचार घेतला.अभिनेता भारत गणेशपुरे आणि अभिनेत्री स्पृहा जोशी यांनी घेतलेल्या एका विशेष मुलाखतीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी नागपूरच्या विकासाचे मॉडेल आणि भविष्यातील योजनांवर सविस्तर भाष्य केले.

नागपूर शहराची आळेख दीक्षाभूमीचे शहर अशीही आहे. हे स्थान पवित्र आणि ऐतिहासिक स्थान आहे. १९९७ मध्ये मी महापौर असताना आणि नितीन गडकरी पालकमंत्री असताना दीक्षाभूमी येथील पाण्याची व अन्य गोष्टी केल्या. आता देखील २०० कोटी रुपये खर्चून दीक्षा भूमी आंतरराष्ट्रीय स्थळ व्हावे असं काम सुरू आहे, अशी माहितीही फडणवीस यांनी दिली.

### चोवीस तास पाणीपुरवठा करण्याचं मॉडेल नागपूर

अभिनेता भारत गणेशपूरे आणि अभिनेत्री स्पृहा जोशी यांनी घेतलेल्या विशेष मुलाखतीवेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईमध्ये सर्वाधिक नाव नितीन गडकरी यांच नाव घेतलं जातं त्यांनी ५५ ब्रिज तयार केलेत. मुंबई पुण्यानंतर सर्वाधिक लोकसंख्येचा नागपुर शहर आहे. या शहरात भरपूर आधुनिकता आहे. नागपुरात सांडपाणी प्रक्रिया होते यामध्ये सांडपाणी मध्ये प्रक्रिया करून निर्मिती करून पैसा गमावणारा पहिला शहर झाले. चोवीस तास पाणीपुरवठा करण्याचं मॉडेल नागपुर मध्ये तयार केले जात आहे. आजही येथे पाण्यासाठी मोर्चे निघत नाही, असेही फडणवीस यांनी सांगितले.

**पंचवीस हजार झोपडपट्टी धारकाना आम्ही मालकीचा पट्टा देतोय**

मी मुख्यमंत्री झाल्यावर नागपुरात झोपडपट्टीमध्ये पट्टे वाटपाचा काम सुरू केलं. सुरुवातीला काही अडचणी आल्या. पुन्हा काही जीआर मध्ये बदल करून आता किमान पंचवीस हजार झोपडपट्टी धारकाना आम्ही मालकीचा पट्टा देतोय. आता नागपूर पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्रात लागू करत झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्यांना त्यांची मालकी आम्ही देत आहोत, असेही फडणवीस यांनी सांगितले.

**समृद्धी महामार्ग केवळ नागपूरसाठी नाही**

मला किंवा नितीन गडकरी साहेबांना संधी मिळाली, तेव्हा आम्ही नागपूरला डोळ्यासमोर ठेवले हे खरे आहे, पण इतर शहरांकडे दुर्लक्ष केले नाही. मुंबईचे बदललेले स्वरूप असो किंवा पुणे आणि संभाजीनगरचा विकास, हे सर्व आमच्या काळातच झाले.

# अंबरनाथ, अकोटमधील युतीने भाजपाचा दुतोंडी चेहरा उघड

### सत्तेसाठी ओवैसींचा एमआयएम ही चालतो : सपकाळ



युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

मुंबई, दि. ८

महानगरपालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत भाजपाची कथनी आणि करणीतली विसंगती पुन्हा एकदा उघड झाली आहे. अंबरनाथ आणि अकोटमधील राजकीय समीकरणांमुळे भाजपाचा दुतोंडी चेहरा समोर आला असून, सत्तेसाठी भाजपाला कोणताही पक्ष चालतोअगदी ओवैसींचा एमआयएम सुद्धा, अशी जोरदार टीका यांनी केली.

जालना येथे महानगरपालिका निवडणूक प्रचारासाठी घेतलेल्या सभेनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी त्यांनी अंबरनाथमधील घडामोडी, अकोटमधील युती, तसेच सत्ताधाऱ्यांकडून होत असलेल्या बिनविरोध प्रक्रियेवरून भाजपावर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला.

अंबरनाथ नगरपालिकेत काँग्रेसच्या १२ नगरसेवकांनी पक्षाशी कोणतीही चर्चा न करता घेतलेली भूमिका पक्षाच्या तत्त्वांना धरून नसल्याचे स्पष्ट करत, काँग्रेसने क्षणाचाही विलंब न लावता त्या १२ नगरसेवकांना बडतर्फ केले, असे सपकाळ यांनी सांगितले.

मात्र दुसरीकडे, ने या नगरसेवकांवर कोणतीही कारवाई न करता त्यांना आपल्या गोटात सामावून घेतले. ''यातून भाजपाचा खरा चेहरा उघड झाला आहे,'' असा आरोप त्यांनी केला.

सपकाळ म्हणाले, ''अंबरनाथमध्ये काँग्रेस भाजप व शिंदेसेनेविरोधात लढली आणि १२ नगरसेवक निवडून आले. पण भाजपाने 'अंबरनाथ विकास आघाडी'साठी थेट पक्षाच्या लेटरहेडवर पत्र जारी केलं. काँग्रेसने त्वरित कारवाई केली; मात्र मुख्यमंत्री यांनी केवळ एक विधान करून विषय संपवला. भाजपाच्या कथनी आणि करणीत स्पष्ट फरक आहे.''

सत्तेसाठी भाजप कोणत्याही तडजोडीला तयार असल्याचा आरोप करत सपकाळ म्हणाले, ''अकोटमध्ये भाजपाने म्हणजेच ओवैसींच्या पक्षाशी युती केली. काँग्रेसमुक्त भारताची भाषा करणारा भाजप आता स्वतःच काँग्रेसयुक्त होत चालला आहे.''

भाजपाच्या मानसिकतेवर प्रहार करताना सपकाळ म्हणाले की, ''भाजपाला सत्तेचा माज आला आहे.

## उद्धवजींनी लावली ब्रेक, गुजरातनं घेतली गती!

मुंबई, दि. ८

महानगरपालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत राजकीय तापमान चढले असतानाच, ठाण्यात दिलेल्या एका खास मुलाखतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. ठाण्याच्या वाहतुकीपासून बुलेट ट्रेनपर्यंतच्या मुद्यांवर बोलताना फडणवीसांनी थेट आरोप करत, ''उद्धवजींना राग आला आणि बुलेट ट्रेनला स्थगिती दिली गेली'' असा खळबळजनक दावा केला.

ठाण्यात 'ठाणे वैभव'चे संपादक मिलिंद बल्लाळ आणि अभिनेत्री तेजश्री प्रधान यांनी घेतलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्री फडणवीस अनेक मुद्द्यांवर स्पष्ट बोलले. विशेषतः ठाणेएमएमआर परिसरातील वाहतूक कोंडी आणि मोठ्या पायाभूत प्रकल्पांबाबत त्यांनी सरकारची भूमिका ठामपणे मांडली. ठाण्यातील वाहतुकीच्या प्रश्नावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ''एमएमआर परिसरात वाहतुकीचा प्रश्न आहे आणि तो सुटायलाच हवा. जुन्या सरकारच्या काळात केवळ ११ किमी मेट्रो होती.



*जीवघेण्या नायलॉन मांजावर शासनाने बंदी घातली. न्यायालयाने जबर दंडाची शिक्षा सुनावली. तरीही काही विक्रेते शासनाच्या आणि न्यायालयाच्या आदेशाला न जुमानता सर्रासपणे नायलॉन मांजाची विक्री करीत आहेत. मनपाच्या उपद्रव शोध विरोधी पथकाने जुनी शुक्रवारीतील मांजाच्या दुकानांची तपासणी केली.*

## मुंढवा जमीनप्रकरणी आणखी मुदतवाढ

मुंबई, दि. ८

मुंढवा येथील शासकीय जमिनीची पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीला विक्री केल्याप्रकरणी राज्य सरकारने चौकशीसाठी नियुक्त केलेल्या उच्चाधिकार समितीला एक महिन्याची मुदतवाढ देऊन ६ जानेवारीला अहवाल देण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र हा अहवाल अद्यापही पूर्ण न झाल्याने या समितीला आणखी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे.

पार्थ पवार यांच्या अमेडिया इंटरप्राइजेस एलएलपी कंपनीने मुंढवा येथील बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडिया यांच्या ताब्यात असलेली चाळीस एकर शासकीय जमीन खरेदी केली. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर त्याची उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांची समिती ६ नोव्हेंबर रोजी नियुक्त केली.

# पक्षविरोधी कारवाई करणाऱ्या ३२ सदस्यांचे ६ वर्षांसाठी निलंबन!

**भाजपची कारवाई**

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

नागपूर, दि. ८

आगामी महानगरपालिका निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीने शिस्त आणि पक्षनिष्ठा याला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे,तरीही जे कार्यकर्ते पक्षाच्या उमेदवाराच्या विरोधात काम करत आहेत किंवा निवडणूक लढत आहेत अश्या भाजपच्या सदस्यांना ६ वर्षासाठी शिस्तभंग व पक्षाची शिस्त मोडून पक्षविरोधी कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या कारणावरून ३२ सदस्यांचे पक्षातून निलंबित करण्यात येत आहे.यात प्रभाग १ मधून: सुनिता महल्ले, प्रभाग २: देवराज वासनिक, प्रभाग ३: नसिमाबानो, प्रभाग ४: सचिन खोब्रागडे व सुरेश टेंभरे, प्रभाग ५: महेन्द्र गुप्ता व पुष्पा किरपाने, प्रभाग ९: रुणाल चौहान, प्रभाग १४: सुनील अग्रवाल, प्रभाग १७: विनायक डेहनकर, प्रभाग १८: धीरज चव्हाण व अक्षय ठवकर, प्रभाग १९: प्रकाश घाटे व पापा यादव, प्रभाग २०: विशाल लारोकर, प्रभाग २१: शुभम मौदेकर, सुलोचना कोवे व राकेश भनारकर, प्रभाग २२: रविशंकर कुंभारे, दशरथ मस्के, आशिष भुते व नंदिनी भुते, प्रभाग २४: टेकचंद सोनबोईर, नंदु अहिर, रेणु गेंडरे, शुभम पडोळे व राजु घोसे, प्रभाग २६: सुनील मानापुरे, प्रभाग ३१: सोनाली घोडमारे, प्रभाग ३२: दिपक चौधरी, प्रभाग ३४: आसावरी कोठीवान व सुनील मानेकर यांचा समावेश आहे.निलंबना बाबत अधिक माहिती देताना भाजपा शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी स्पष्ट केले की, ''भारतीय जनता पार्टी हा शिस्तबद्ध कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. निवडणुकीच्या काळात पक्षाचा आदेश अंतिम असतो. जो कोणी पक्षाच्या अधिकृत उमेदवाराचे काम करणार नाही किंवा पक्षाच्या विरोधात छुपी खेळी करेल,त्याची गय केली जाणार नाही.या निलंबनानंतर,सदर व्यक्तीचा भारतीय जनता पार्टीच्या कोणत्याही कार्यक्रमाशी, पदाशी किंवा मोहिमेशी संबंध राहणार नाही.सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी याची नोंद घ्यावी आणि अधिकृत उमेदवाराच्या विजयासाठी जोमाने कामाला लागावे, असे आवाहनही पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

## २२७ वॉर्डात १७०० उमेदवार रिंगणात

मुंबई, दि. ८

मुंबई महानगरपालिकेच्या २२७ वॉर्डांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होत आहे. २ जानेवारी रोजी अनेक उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर आता निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या उमेदवारांची निश्चिती झाली आहे. एकूण १,७०० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून त्यापैकी ८७९ महिला तर ८२१ पुरूष उमेदवार निवडणूक लढवत आहेत. मुंबई महानगरपालिकेची शेवटची निवडणूक फेब्रुवारी २०१७ मध्ये झाली होती. ७ मार्च २०२२ रोजी मुंबई महानगरपालिकेत निवडून आलेल्या सदस्यांची मुदत संपली होती. मात्र त्यानंतर निवडणूक होऊ शकली नाही. त्यानंतर राज्य सरकारने नियुक्त केलेल्या आयुक्तांकडून महानगरपालिकेचा कारभार हाकला जात होता.

# १२ नगरसेवकांवर कायदेशीर कारवाई करणार : सचिन सावंत

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

मुंबई, दि. ८

अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेल्या १२ नगरसेवकांनी भाजपमध्ये केलेला प्रवेश हा पूर्णपणे बेकायदेशीर आहे. या सर्व १२ नगरसेवकांचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी काँग्रेस पक्ष कायदेशीर कारवाई करणार असल्याची माहिती प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी गुरुवारी दिली.



गेल्या महिन्यात अंबरनाथ नगरपालिकेची निवडणूक पार पडली. या निवडणुकीत भाजपचा नगराध्यक्ष निवडून आला आहे. मात्र, नगरपालिकेत बहुमत नसल्याने भाजपने सत्तेसाठी काँग्रेस नगरसेवकांना सोबत घेऊन स्वतंत्र गट स्थापन केला . पक्षाला अंधारात ठेवून भाजपशी सलगी करण्याच्या स्थानिक नेतृत्वाच्या कृतीची गंभीर दखल घेत काँग्रेसने बुधवारी १२ नगरसेवकांची पक्षातून हकालपट्टी केली.

पक्षाच्या या कारवाईनंतर १२ नगरसेवकांनी आज नवी मुंबईत भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. या पक्षप्रवेशानंतर काँग्रेसने १२ नगरसेवकांच्या विरोधात कायदेशीर लढाई लढण्याचा निर्णय घेतला आहे. स्वतंत्र गट स्थापन करणे किंवा नंतर दुसऱ्या पक्षात प्रवेश करणे हे अनैतिक तर आहेच पण असंवैधानिकही आहे. त्यामुळे यासंदर्भात लवकरच सर्वांना कायदेशीर नोटीसा बजावण्यात येतील,असे सचिन सावंत यांनी सांगितले.

# दंडाची रक्कम एखाद्या व्यक्तीच्या जीवापेक्षा मोठी नाही

## प्राणघातक नायलॉन मांजा प्रकरण : पुढाल सुनावणी सोमवारी

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

नागपूर, दि. ८

नायलॉन मांजा गळ्याला अडकून काहींचे बळी गेले असून अनेकांचे अपघात झाले आहेत. त्यामुळे नायलॉन मांजा वापरणायावर आणि विक्री करणायांवर लावलेला दंड हा एखाद्याच्या जीवापेक्षा मोठी नाही. लोकांजी जीव महत्वाचा आहे, असे नायलॉन मांजावर लावलेल्या दंडावर दाखल एका मध्यस्थी अर्जावर मौखिकपणे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने म्हटले आहे.

नायलॉन मांजाने पतंग उडविताना आढळ्यास ५० हजार रुपये दंड आणि नायलॉन मांजा विक्री करणाया दुकानदारावर अडीच लाख रूपयांचा दंड ठोठावण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले असले तरी यासंदर्भात कुणाचे काही आक्षेप असल्यास त्यांनी मत मांडावे, असेही न्यायालयाने म्हटले आहे. याप्रकरणी आता सोमवारी (ता. १२ जानेवारी) रोजी सुनावणी होणार आहे.

विदभार्तील सर्व जिल्हाधिकायांना मराठी, हिंदी व इंग्रजी या सर्व अग्रगण्य वर्तमानपत्रात पहिल्या पानावर नायलॉन मांजा वापरु नये तसेच आक्षेप नोंदविण्यासंदर्भात 'पब्लिक नोटीस' प्रकाशित करण्याचे



आदेश मागील सुनावणीत उच्च न्यायालयाने दिले होते. परंतु या आदेशाचे पालन विदर्भातील जिल्हाधिकायांनी केले नसल्याचे दिसून आले आहे. जिल्हाधिकायांनी केवळ निवडक हिंदी व मराठी वर्तमानपत्रात 'पब्लिक नोटीस' पहिल्या पानावर प्रकाशित करण्यास दिली होती. याच प्रकरणात उच्च न्यायालयाने संबंधित जिल्हाधिकायांना ५ जानेवारी रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान चांगलेच फटकारले होते. तसेच न्यायालयाने त्यांना आदेशाचे पालन करण्यासही सांगितले होते. दरम्यान नायलॉन मांजाने पतंग उडविताना आढळला तर ५० हजार रुपये दंड आणि नायलॉन मांजा विक्री करणाया दुकानदारावर अडीच लाख रूपयांचा दड ठोठावण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहे. या दंडाच्या रकमेबाबत काही आक्षेप नोंदवायचे असेल तर त्यांनी ८ जानेवारीच्या सुनावणीपूर्वी नोंदवावे. त्यासाठी जनतेला सूचना मिळण्यासाठी व आक्षेप नोंदविण्यासाठी उच्च न्यायालयाने सर्व जिल्हाधिकायांना अग्रगण्य वर्तमानपत्रात मंगळवारी (७ जानेवारी) रोजी पब्लिक नोटीस देण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार विदर्भातील सर्व अग्रगण्य वर्तमानपत्रात पब्लिक नोटीस देण्यात आली नसल्याचे आढळून आले आहे, असे वकिलांनी सांगितले. सरकारतें अॅड. शिशीर उके, प्रदूषण नियंत्रण मंडळातें अॅड. रवी सन्याल यांनी बाजू मांडली.

### पालकांसाठी दंडाची रक्कम जास्त?

नायलॉन मांजाचा वापर व विक्रीवर दंड जास्त असल्याचा मध्यस्थी अर्ज मोहमंद अल्ताफ खान यांनी दाखल केला. त्यांनी गुरुवारी न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्यासमक्ष झालेल्या सुनावणीदरम्यान स्वतः बाजू मांडली. खान यांनी बाजू मांडताना सांगितले की, नायलॉन मांजा वापरण्यावर व विक्रीवर लावलेला दंड जास्त आहे. ते पालक व लहान विक्रेते भरू शकत नाही. पालक मुलांवर चोवीस तास लक्ष ठेवू शकत नाही. तसेच लहान मुलांनी पालकांच्या अपरोक्ष नायलॉन मांजाने पतंग उडविल्यास पालकाला नाहक भुर्दंड बसेल. लहान विक्रेत्यांना जर अडीच लाख रुपये दंड ठोठावला तर त्याचे आर्थिकदृष्ट्या कंबरडे मोडेल. त्यामुळे न्यायालयाने दंडाची रक्कम कमी करावी, याबाबत विचार करावा, असेही खान म्हणाले.

### दंड फक्त नियमांचे उल्लंघन करणायांनाच : न्यायालय

नायलॉन मांजामुळे जर एखाद्याचा जीव गेला तर ती जीवित हाणी न भरुन निघणारी आहे. दंड हा कुणाचे आर्थिक नुकसान व्हावे यासाठी नसून मांजा विक्रेत्यांवर वचक बसावा म्हणून आहे. दंडाबाबत प्रत्येक जण हा समान आहे. लहान किंवा व मोठा विक्रेता असा भेद करता येणार नाही. जे नियमांचे उल्लंघन करतात त्यांच्याकरिता दंड आहे. नायलॉन मांजा वापरलाच नाही किंवा विक्री केलाच नाही तर दंड भरण्याचा प्रश्नही उद्भवत नाही, असेही उच्च न्यायालयाने नमूद केले.

## मेट्रो-३मध्ये मोबाईल नेटवर्कचा प्रश्न

मुंबई, दि. ८

आरे ते कफ परेड मेट्रो ३ मार्गिका पूर्ण क्षमतेने सेवेत दाखल होऊन आज तीन महिने पूर्ण झाले. मात्र तरीही या मार्गिकेवरील मोबाइल नेटवर्कचा प्रश्न मार्गी लागलेला नाही. या मार्गिकेवरुन प्रवास करताना मोबाइलचा वापरच करता येत नसल्याने प्रवाशांमध्ये नाराजी आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला (एमएमआरसी) अजूनही मोबाईल नेटवर्कचा प्रश्न निकाली काढता आलेला नाही. मोबाईल नेटवर्कची सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी मोबाईल कंपन्यांना तयार करण्यात एमएमआरसी यशस्वी ठरत नसल्याचे चित्र आहे.एमएमआरसी आणि कंपन्यांचा वादात प्रवाशांची मात्र मोठी गैरसोय होत आहे.

एमएमआरसीकडून आरे ते कफ परेड अशा ३३.५ किमीच्या भुयारी मार्गिकेतील आरे ते बीकेसी असा पहिला टप्पा ऑक्टोबर २०२४ मध्ये सेवेत दाखल करण्यात आला आहे.

# काँग्रेस, भाजपा, शिवसेनेकडून स्विकृत सदस्यांचे नामांकन दाखल

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी,

यवतमाळ, दि. ८ जानेवारी

नगराध्यक्ष व नगरसेवकांची निवडणूक झाल्यानंतर नगरपालिकेत स्वीकृत सदस्यांची शुक्रवारी (ता.९) निवड होणार आहे. यामध्ये भाजपा शहर विकास आघाडी, काँग्रेस, शिवसेना (शिंदे) यांच्याकडून नामांकन अर्ज आज दाखल करण्यात आले. यामध्ये भाजपाकडून तीन नामांकन दाखल करण्यात आले असून काँग्रेसकडून दोन तर शिवसेनेकडून सहा जणांनी नामांकन सादर केले.

यामध्ये शहर विकास आघाडी कडून अमोल देशमुख, रेखाताई कोठेकर, पंकज नानवाणी, काँग्रेसकडून संतोष बोरेले, अब्दुल जाकीर अब्दुल करीम तर शिवसेना (शिंदे) कडून गजानन इंगोले, विवेक गावंडे, विशाल गणात्रा यांचे नामांकन पात्र झाले आहे. मोहन देशमुख, प्रवीण निमोदीया, राजू चांदेकर यांचे नामांकन अपात्र झाले आहेत. तसे पाहता भाजपाकडे संख्याबळ पाहता तीनच स्विकृत सदस्यांची शक्यता होऊ शकते काँग्रेसकडेही संख्याबळ पाहता



एकच स्विकृत सदस्याचे नामांकन राहु शकते, शिवसेनेकडून तीन जणांनी नामांकन दाखल केले यामध्ये आता ते कोणती खेळी खेळणार आहेत कारण की तीन नामांकन दाखल केल्यामुळे त्यांच्याकडे पुरेशी संख्याबळ नसल्यामुळे हे सुध्दा त्यांनी तीन नामांकन दाखल केल्यामुळे काय चमत्कार घडतो याकडे लक्ष लागले आहे.

९ जानेवारी रोजी होणा-या सदस्यांच्या निवडणूकींसाठी उद्या चित्र स्पष्ट होणार आहे.

युवाराष्ट्र दर्शन
# चंद्रपूर जिल्हा
२
शुक्रवार दि.९ जानेवारी २०२६

## जन्म - मृत्यु नोंदणीबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** नवजात बालकांच्या जन्माची नोंद तसेच मृत्यु पावलेल्या नागरिकांची नोंद अचूक आणि तात्काळ करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज (दि. ८) आरोग्य विभागाशी संलग्न यंत्रणेची बैठक घेऊन आढावा घेतला.जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कल्पना क्षीरसागर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) मिना साळूंके यांच्यासह गटविकास अधिकारी उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, वेळेवर जन्म - मृत्यु नोंदणी करणे अतिशय आवश्यक झाले आहे. नागरिकत्वाच्या पुराव्याकरीता ही कागदपत्रे महत्वाची असून सदर नोंदणी किंवा प्रमाणपत्र देण्यासंदर्भात कोणतीही हयगय करू नये. जन्म कुठे झाला, कोणती तारीख, आई-वडीलांचे नाव याबाबी नोंदणी करताना न चुकता घ्याव्यात. तसेच नोंदणी करण्यास उशीर झाला तर अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ग्रामीण भागात आशा स्वयंसेविकांना याबाबत अवगत करावे, अशा सुचना त्यांनी दिल्या.जन्म - मृत्यु घटनांची विलंबाने माहिती देणा-या किंवा माहिती देण्यास टाळाटाळ करणा-या खाजगी रुग्णालयांना सुधारीत कायद्यानुसार आता १ हजार रुपये दंडाची तरतूद करण्यात आली आहे. महिला व बालकल्याण विकास विभागाच्या १४ मार्च २०२४ च्या शासन निर्णयान्वये शासकीय दस्तऐवजांवर आईचे नाव बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार १ मे २०२४ नंतर जन्मलेल्या बालकांच्या प्रमाणपत्रामध्ये बालकाचे नाव, आईचे नाव, वडीलांचे नाव आणि शेवटी आडनाव अशा स्वरुपाची नोंद करण्यात येते.

# मनपा प्रशासनाने परवानगी नसलेले १३० बॅनर्स हटविले

## उमेदवारांकडून नियमांकडे दुर्लक्ष

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात प्रचाराला वेग आला असतानाच मनपा प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. शहरातील विविध चौक, मुख्य रस्ते, वसाहती व सार्वजनिक ठिकाणी परवानगी न घेता लावण्यात आलेले तब्बल १३० प्रचार बॅनर्स मनपा प्रशासनाने हटविले आहेत.

मनपा प्रशासनाने यापूर्वीच निवडणूक आचारसंहितेनुसार बॅनर, पोस्टर, होर्डिंग्ज लावण्यासाठी संबंधित विभागाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र अनेक उमेदवार व त्यांच्या समर्थकांकडून या सूचनांकडे दुर्लक्ष करत थेट सार्वजनिक ठिकाणी बॅनर्स लावण्यात आले. यामुळे शहराच्या सौंदर्यावर परिणाम होत असल्यासोबतच वाहतूक व सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

त्यानंतर अतिक्रमण व परवाना विभागाच्या पथकाने संयुक्त कारवाई करत शहरातील प्रमुख चौक, उड्डाणपूल, विद्युत खांब, झाडे तसेच सार्वजनिक इमारतींवरील बॅनर्स काढून टाकले. या कारवाईत विविध पक्षांच्या व अपक्ष उमेदवारांचे बॅनर्स हटविण्यात आले असून कोणताही भेदभाव करण्यात आलेला नसल्याचे मनपा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, परवानगीशिवाय प्रचार साहित्य लावणाऱ्या उमेदवारांवर पुढील काळात दंडात्मक कारवाई करण्याचा इशाराही मनपा प्रशासनाने दिला आहे. निवडणूक काळात नियमांचे उल्लंघन केल्यास थेट निवडणूक आयोगाकडे अहवाल सादर केला जाईल, असेही सांगण्यात आले.मनपा प्रशासनाच्या या कारवाईमुळे उमेदवारांमध्ये खळबळ उडाली असून, आगामी काळात प्रचार करताना नियम पाळण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## एक खिडकी कक्षातर्फे ८९२ अर्ज मंजूर



निवडणूक आचारसंहिता जाहीर होताच प्रत्येक उमेदवाराने त्याच्या प्रचार साहित्याची परवानगी मनपाकडुन घेणे बंधनकारक आहे. मात्र काही उमेदवार अथवा राजकीय पक्षांद्वारे रीतसर परवानगी न घेता परस्पर बॅनर ,पोस्टर्स, होर्डिंग लावण्यात आल्याचे निदर्शनास येत असल्याने, त्यावर कारवाई करून ३ जानेवारी पासुन सुमारे १३० कट-आऊट,बॅनर व १५० झेंडे काढण्यात आले आहे. चंद्रपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी आचारसंहिता लागु झाल्यानंतर प्रचार कार्यालय, रॅली, मेळावा, मिरवणुक, रोड शो, बॅनर, कट आऊट, पोस्टर्स, जाहीर सभा, कॉर्नर सभा, प्रचार वाहन इत्यादी विविध परवानगीसाठी चंद्रपूर महनगरपालिका प्रशासनाद्वारे सुरु करण्यात आलेल्या एक खिडकी कक्षाद्वारे ७ जानेवारीपर्यंत प्राप्त ११०६ अर्जांपैकी ८९२ अर्ज मंजूर,२१ अर्ज नामंजूर तर १९३ अर्ज प्रलंबित आहेत. यापुढे जे उमेदवार अथवा राजकीय पक्ष रीतसर परवानगी न घेता परस्पर बॅनर ,पोस्टर्स, होर्डिंग लावतील अशा उमेदवाराकडून प्रत्येकी २ हजार रुपये दंड आकारण्यात येणार असल्याचे प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

# चांदा क्लब ग्राऊंडवर १४ ते २२ जानेवारी ला श्रीराम कथा चे आयोजन

## मानस मर्मज्ञ पूज्य राजन जी महाराज करणार श्रीराम कथेचा शंखनाद



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** चंद्रपूरच्या आध्यात्मिक इतिहासात एक नवा अध्याय जोडला जाणार आहे. लखमापूर हनुमान मंदिराच्या तत्वावधानाखाली व श्रीराम कथा सेवा समितीच्या वतीने आयोजित, १४ ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीत 'लखमापूर धाम' (चांदा क्लब ग्राउंड) येथे श्रीराम कथा चे आयोजन करण्यात आल्याची माहिती आ.सुधीर मुनगंटीवार यांनी आयोजित पत्रपरिषदेत दिली.



आ.मुनगंटीवार पूढे म्हणाले की, परम पूज्य राजन जी महाराज आपल्या अमृतमय वाणीने प्रभू श्रीरामांच्या पावन लीलांचे रसपान घडविणार आहेत.

पूज्य राजन जी महाराज यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे साधेपणा व विद्वत्तेचा अद्भुत संगम आहे. त्यांच्या कार्यक्रम नसून, संस्कारांच्या पुनर्जागरणाचा एक महोत्सव ठरणार आहे.जगप्रसिद्ध मानस मर्मज्ञ जीवनातील काही विशेष बाबी या कथेला अधिकच महत्त्वपूर्ण बनवतात. पश्चिम बंगालमधील मिदनापूर येथे जन्मलेले व उत्तर प्रदेशातील बलिया येथील संस्कारांनी घडलेले महाराज जी यांनी बालपणापासूनच रामायण व अध्यात्माला आपले संपूर्ण जीवन अर्पण केले. महाराज जी यांनी भारतातील प्रत्येक राज्यातच नव्हे, तर अमेरिका, ब्रिटन, कॅनडा तसेच आखाती देशांमध्येही श्रीराम कथेचा गंगाप्रवाह वाहिला आहे.महाराज जी यांच्या कथेची सर्वात मोठी वैशिष्ट्ये म्हणजे ते कथेला वर्तमान जीवनातील समस्यांशी जोडतात. त्यांच्या प्रेरणेतून आजपर्यंत लाखो लोकांनी मांसाहार, नशा व इतर कुप्रथांचा त्याग करून 'राम-पथ' स्वीकारला आहे.कथेपूर्वी १३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजता श्री लक्ष्मी नारायण मंदिरातून एक भव्य शोभायात्रा निघणार आहे. या शोभायात्रेत सुमारे ७,००० हून अधिक भक्त सहभागी होतील, ज्यामध्ये ५०० मातृशक्ती पारंपरिक वेशभूषेत कलश धारण करून सहभागी होणार आहेत. हजारो युवकांची टोळी, भजन मंडळया आणि भव्य झांक्यांमुळे चंद्रपूरच्या रस्त्यांना 'अयोध्यामय' स्वरूप प्राप्त होणार आहे.आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार व सौ. सपना मुनगंटीवार यांच्या संरक्षणाखाली, तसेच श्रीराम कथा सेवा समितीचे अध्यक्ष हरीशजी भट्टड व समिती सदस्यांच्या सहकार्याने हा भव्य आयोजन करण्यात येत आहे.'हा प्रसंग केवळ कथा ऐकण्याचा नसून, आपल्या अंतःकरणातील राम जागवण्याचा आहे. चंद्रपूरचे हे सौभाग्य आहे की पूज्य राजन जी महाराज आपल्या नगरात पधारत आहेत. १४ ते २२ जानेवारी दरम्यान दररोज दुपारी ३ ते संध्याकाळी ७ या वेळेत प्रभूच्या चरणी आपल्या जीवनातील काही क्षण अर्पण करावेत, असे आवाहन आ.सुधीर मुनगंटीवार यांनी पत्रपरिषदेतून केले.यावेळी चंदनसिंह चंदेल, राजेन्द्र गांधी, हरीश शर्मा, डॉ.मंगेश गुलवाडे, प्रशांत कोलप्याकवार, हरीश भट्टड, दिनेश नाथवानी, उमाशंकर सिंह, आनंद झा, विजय शुक्ला, प्रकाश धारणे, डॉ.शैलेन्द्र शुक्ल, काशीनाथ सिंह, पिंटू जी तसेच श्रीमती मीना ताई देशकर हे प्रमुख उपस्थित होते.

# भाजप व काँग्रेसकडून अनेक प्रभागात प्रचार कार्यालय उद्घाटनाचा सपाटा

## निवडणुकीच्या प्रचारात आघाडी घेण्यासाठी चढाओढ


**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** भाजप व काँग्रेस या प्रमुख पक्षांकडून प्रचाराला जोर चढताना दिसत आहे. शहरातील अनेक प्रभागांमध्ये प्रचार कार्यालयांच्या उद्घाटनांचा सपाटा सुरू असून, दोन्ही पक्षांकडून शक्तीप्रदर्शनासह निवडणूक रणधुमाळीला सुरुवात झाली आहे.

भाजपकडून विविध प्रभागांमध्ये उमेदवारांच्या प्रचारासाठी स्वतंत्र कार्यालये सुरू करण्यात येत आहेत. या उद्घाटनप्रसंगी आ.किशोर जोरगेवार, हंसराज अहीर, स्थानिक पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित राहत असून 'डबल इंजिन सरकार', विकासकामे आणि केंद्र-राज्य सरकारच्या योजनांचा मुद्दा ठळकपणे मांडला जात आहे. प्रत्येक प्रभागात संघटन मजबूत ठेवत डोअर टू डोअर प्रचाराची आखणी करण्यात येत आहे.

दुसरीकडे काँग्रेसकडूनही मागे न राहता शहरातील अनेक प्रभागांमध्ये प्रचार कार्यालयांची उद्घाटने होत आहेत. आज काँग्रेस विधीमंडळ नेते आ.विजय वडेट्टीवार उमेदवारांच्या प्रचारासाठी उतरले आहे.स्थानिक प्रश्न, महागाई, बेरोजगारी, नागरिकांच्या मूलभूत सुविधांचा अभाव यावर भर देत काँग्रेस उमेदवार मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहेत. उद्घाटनप्रसंगी काँग्रेस नेते व कार्यकर्त्यांकडून एकजुटीचा संदेश देण्यात येत असून संघटन बांधणीवर भर दिला जात आहे.

दोन्ही पक्षांकडून प्रचार कार्यालये ही संपर्काचे मुख्य केंद्र म्हणून वापरली जाणार असून येथे मतदार संवाद, बैठका, प्रचार साहित्याचे वितरण व पुढील कार्यक्रमांचे नियोजन केले जाणार आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत शहरातील प्रत्येक प्रभागात प्रचाराचा वेग आणखी वाढण्याची शक्यता आहे.भाजप व काँग्रेसकडून सुरू असलेल्या या प्रचार कार्यालय उद्घाटनांमुळे चंद्रपूर शहरात निवडणूक वातावरण चांगलेच तापले असून, प्रभागनिहाय लढत अधिक रंगतदार होणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

## भद्रावती शहरातील जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही : नगराध्यक्ष प्रफुल चटकी



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**भद्रावती दि.८ :** भद्रावती नगर परिषदेचा पदग्रहण सोहळा गुरुवार, दिनांक ८ जानेवारी रोजी उत्साहात व जल्लोषात पार पडला.

या सोहळयात मताधिक्याने निवडून आलेले नगराध्यक्ष प्रफुल रामदास चटकी यांनी विधिवत पदभार स्वीकारला. याचवेळी उपाध्यक्षपदी सलग तीन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आलेले सुधीर सातपुते यांनीही पदभार स्वीकारला.

उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी पीठासन अधिकारी म्हणून नगराध्यक्ष प्रफुल चटकी यांनी काम पाहिले. या निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) तर्फे सुधीर सातपुते, तर काँग्रेस कडून अनिल पडोळे यांनी नामांकन अर्ज दाखल केले होते. झालेल्या मतदानात सुधीर सातपुते यांना १८ मते, तर अनिल पडोळे यांना १२ मते मिळाली. सहा मतांच्या फरकाने सुधीर सातपुते यांनी विजय संपादन केला.सत्तारूढ पक्षाच्या वतीने राजेश बदखल तसेच शिवसेना (उबाठा) गटाचे नरेंद्र पढाल यांची स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. तर काँग्रेस पक्षाकडून सुनील नामोजवार यांची स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.नगराध्यक्ष पदग्रहण दालनाचे उद्घाटन मुकेश जिवतोडे, जिल्हा संघटक, शिवसेना (शिंदे गट) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भद्रावती नगर परिषदेच्या मुख्याधिकारी डॉ. विशाखा शेळकी उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे कार्यवृत्तांत राजू काळे यांनी सादर केले, तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन उपमुख्याधिकारी विजय जांभुळकर यांनी केले.

## मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त मराठी पुस्तकांचे प्रकाशन

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** जिल्हा मराठी भाषा समिती, चंद्रपूर यांच्या वतीने मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी दरवर्षी १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. त्यानुसार यावर्षी देखील मराठी भाषेसंदर्भातील विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.चंद्रपूर जिल्हा मराठी भाषा समितीच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या अनुषंगाने मराठी पुस्तकांचे प्रकाशन करण्याचे नियोजित आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील साहित्यिकांना आपली पुस्तके प्रकाशित करावयाची आहेत, अशा लेखकांनी ११ जानेवारी पर्यंत जिल्हा ग्रंथालय अधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा मराठी भाषा समितीकडे संपर्क साधावा. विहित मुदतीनंतर प्राप्त होणा-या विनंतीचा स्विकार केला जाणार नाही.

## मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर अंतर्गत विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात. यात साफसफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, इयत्ता ९वी व १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकपुर्व शिष्यवृ?त्ती, इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण फी/ परीक्षा फी या शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

वरील सर्व योजना सन २०२५-२६ पासून महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत असल्याने सर्व मान्यताप्राप्त शाळेतील मुख्याध्यापकांनी त्यांच्या शाळेतील शिष्यवृ?त्तीकरीता पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन सादर करावे, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी केले आहे.

# गत वर्षभरात नायलॉन मांजा प्रकरणी २८ जणांवर गुन्हे दाखल

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** दरवर्षी नायलॉन मांजामुळे अनेक लोक जखमी होतात किंवा काही जणांचा मृत्यु होतो. त्यामुळे उच्च न्यायालयाने याची गंभीर दखल घेतली असून विक्री व वापर कर्त्यांविरुध्द शिक्षेची तसेच दंडात्मक कारवाई किंवा दोन्ही बाबींची तरतूद करण्यात आली आहे.

याच अनुषंगाने जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या मार्गदर्शनात जिल्हा प्रशासनाने सुध्दा नायलॉन मांजा विक्री करणारे व त्याचा वापर करणा-यांविरुध्द कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. गत वर्षभरात म्हणजे जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत २६ प्रकरणांमध्ये एकूण २८ जणांविरुध्द गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई तर ५ लक्ष ५६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गतवर्षी दाखल गुन्ह्यांमध्ये चंद्रपूर शहर पोलिस स्टेशनमध्ये ८ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून १ लक्ष ६१ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

रामनगर पोलिस स्टेशनमध्ये नायलॉन मांजासंदर्भात ५ आरोपींवर गुन्हा दाखल तर १ लक्ष ७१ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त, मुल पोलिस स्टेशनमध्ये ३ आरोपी, ५६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल, राजुरा पो.स्टे मध्ये २ आरोपी व ७८०० रुपयांचा मुद्देमाल, भद्रावती पो.स्टे २ आरोपी व १३ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल, घुग्घुस पो.स्टे १ आरोपी व ३२०० रुपयांचा मुद्देमाल, दुर्गापूर पो.स्टे १ आरोपी व ६० हजार रुपयांचा मुद्देमाल, वरोरा पो.स्टे २ आरोपी व ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल, कोठारी पो.स्टे १ आरोपी व ४ हजार रुपयांचा मुद्देमाल, बल्लारपूर पो.स्टे १ आरोपी व ८ हजार रुपयांचा मुद्देमाल, गडचांदूर पो.स्टे १ आरोपी व २ हजार रुपयांचा मुद्देमाल तर सिंदेवाही पोलिस स्टेशनमध्ये १ आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करून १४ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नायलॉन मांजाचा वापर अतिशय धोकादायक आहे. नायलॉन मांजा वापर करणारे तसेच त्याची विक्री करणारे विक्रेते नागरिकांच्या दुर्घटनेसाठी जबाबदार आहे. अशा विक्रेत्यांविरोधात यंत्रणेने सक्त कारवाई करावी. त्यासाठी संयुक्त पथकांचे गठन करून बाजारात किंवा विक्री होत असलेल्या भागात नियमित गस्त घालावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले आहे.

## छोटूभाई पटेल हायस्कूलचे कलाशिक्षक सुदर्शन बारापात्रे यांची राज्यस्तरीय पोस्टर स्पर्धेसाठी निवड



**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या अंतर्गत दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, गडचिरोली यांच्या वतीने आयोजित नागपूर विभागीय शिक्षक पोस्टर स्पर्धेत छोटूभाई पटेल हायस्कूल, चंद्रपूर येथील कलाशिक्षक सुदर्शन बारापात्रे यांनी उल्लेखनीय यश संपादन करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळविली आहे.

राज्यस्तरीय शिक्षक पोस्टर स्पर्धा दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, परभणी येथे आयोजित करण्यात आली असून महाराष्ट्रातील आठही विभागांतील पात्र शिक्षक या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

नागपूर विभागातील विविध जिल्ह्यांतील शिक्षकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. विषयाची मांडणी, कल्पकता तसेच संशोधनात्मक दृष्टिकोन यामुळे सुदर्शन बारापात्रे यांचे पोस्टर परीक्षकांच्या विशेष पसंतीस उतरले.अध्यापनासोबतच सहशालेय उपक्रम, चित्रकला, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध शैक्षणिक स्पर्धांचे प्रभावी आयोजन करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेले कलाशिक्षक म्हणून सुदर्शन बारापात्रे यांची शैक्षणिक क्षेत्रात विशेष ओळख आहे.या यशामुळे छोटूभाई पटेल हायस्कूलच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक राजीव मानकर, पर्यवेक्षक श्री. विकास निंबाळकर, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सुदर्शन बारापात्रे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# खेळामधून होतो व्यक्तिमत्वाचा विकास - अपर पोलिस अधिक्षक कातकडे

## चाचा नेहरू बाल महोत्सवाचे उद्घाटन




**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** खेळामध्ये यश-अपयश या गोष्टीची पर्वा न करता मुलांनी प्रत्येक स्पर्धेत भाग घ्यावा. त्यातूनच आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास होत असतो. आपल्या मुलांना मैदानी खेळ तथा कला कौशल्य जोपासू द्या, असे आवाहन अपर पोलिस अधिक्षक ईश्वर कातकडे यांनी केले. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित चाचा नेहरू बालमहोत्सव २०२५-२६ च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महिला व बालविकास नागपूरचे विभागीय उपायुक्त दत्तात्रय मुंडे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मिनाक्षी भस्मे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी भागवत तांबे, बालकल्याण समितीच्या अध्यक्षा ॲड. क्षमा बासरकर, सदस्य वनिता घुमे, ज्योत्स्ना मोहितकर, महिला व बालविकास अधिकारी लक्ष्मण हगवणे, जिल्हा परिविक्षा अधिकारी मोरेश्वर झोडे, आदी उपस्थित होते.

उपायुक्त दत्तात्रय मुंडे यांनी स्पर्धेत सहभाग घेतांना यशाची पर्वा न करता सहभाग घ्यावा, याबाबत मार्गदर्शन केले. तसेच स्पर्धेत यशस्वी ठरणाऱ्या व चांगल्या खेळाचे प्रदर्शन करणाऱ्या खेळाळूंना विभागीय तथा राज्यस्तरावर संधी देण्यात येणार असल्याचे सांगितले.

जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागाअंतर्गत कार्यरत शासकीय/स्वयंसेवी संस्थामध्ये पुनर्वसनासाठी दाखल करण्यात येणाऱ्या अनाथ, निराधार, निराश्रीत ज्यांना काळजी व संरक्षणाची गरज आहे, असे बालक व विधी संघर्षग्रस्त बालके, बालसंगोपन योजनेचे लाभार्थी तसेच शाळांमध्ये शिकत असलेले सर्वसामान्य बालके यांच्यामध्ये एकमेकांविषयी बंधूभाव निर्माण होण्यासाठी तसेच त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा याकरीता ७ ते ९ जानेवारी २०२६ या कालावधीत जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमात कौटूबिंक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, बालकामगार प्रतिबंध, बालविवाह प्रतिबंध, बालशोषण प्रतिबंधावर स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. तथा महिला व बालविकास विभागाच्या केंद्र पुरस्कृत मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा व रेल्वे चाईल्ड हेल्पलाईन, बालगृह योजना, मिशन शक्ती अंतर्गत महिला हेल्पलाईन १८१, महिला सक्षमीकरण केंद्र, सखी वन स्टॉप सेंटर, शक्तिसदन, वर्किंग वूमन हॉस्टेल, कामाचे ठिकाणी महिलांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा, अनाथ प्रमाणपत्र, बालसंगोपन, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, परिविक्षा अधिनियम आदी योजनांबाबत जनजागृती करण्यात आली.विद्यार्थ्यांचा मानसिक, शारिरीक व कौशल्यात्मक विकास व्हावा व बालगृहातील मुलांना बाहेर जगातील स्पर्धांना सामोरे जाण्याचे धैर्य निर्माण व्हावे, यासाठी चाचा नेहरू बालमहोत्सवाचे आयोजन केल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मिनाक्षी भस्मे यांनी आपल्या प्रास्ताविकातून दिली. कार्यक्रमाचे संचालन कल्पना राजूरकर यांनी केले तर आभार जिल्हा परिविक्षा अधिकारी मोरेश्वर झोडे यांनी मानले.

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
शुक्रवार दि.०९ जानेवारी २०२६

## सन्मित्र गणेश मंडळ गणेशपूर मंडळाला प्रथम पुरस्कार

**भंडारा :** राज्य शासनाच्या वतीने आयोजित उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा-२०२५ चा निकाल जाहीर झाला असून जिल्हास्तरावर सन्मित्र गणेशोत्सव मंडळ, गणेशपूर या मंडळाने उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ म्हणून प्रथम पुरस्कार पटकावून जिल्ह्यात मानाचा लौकिक मिळविला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय समितीचे समन्वयक सावन कुमार यांच्या हस्ते विजेत्या मंडळांचा सन्मान करण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय निवड समितीचे अध्यक्ष मनोहर चव्हान, जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हास्तरीय निवड समितीच्या सदस्य सचिव तारकेश्वरी बोरीगिड्डे उपस्थित होते.

सन्मित्र गणेशोत्सव मंडळ, गणेशपूर या मंडळाला जिल्हास्तरावर प्रथम पुरस्काराचे पारितोषिक प्राप्त झाले असून पुरस्कार स्वरूपात ५० हजार रुपये रोख रक्कम व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. सदर पारितोषिक सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते मुंबई येथे प्रदान करण्यात आले.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# कोणाकडेही तक्रार करा, सेवा निवृत्ती प्रकरणे मर्जीने काढीन!

■ शिक्षण विभागातील लिपिक महेश तिजारेची मुजोरी
■ विदर्भ खाजगी प्राथमिक शिक्षक संघांचा आरोप



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**भंडारा :** जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक शिक्षकांची सेवानिवृत्ती प्रकराणाची सध्यास्थिती जाणून घेण्यासाठी विदर्भ खाजगी प्राथमिक शिक्षक संघांचे जिल्हा कार्यवाही प्रभाकर मेश्राम गुरुवारी कार्यालयात गेले. मात्र शिक्षणाधिकारी नसल्याने सेवा निवृत्ती प्रकारणांशी संबंधित कर्मचारी महेश तिजारे यांचेशी संपर्क केला असता, चार चार महिण्यापासून सेवानिवृत्त प्रकरणे पेंडिंग आहेत, माझीं शिक्षणाधिकारीकडे तक्रार करा, वेळ मिळेल तेव्हा माज्या मर्जीने सेवा निवृत्ती प्रकरणे निकाली काढीन, कोणाकडेही जा, मी घाबरत नाही. अशा उर्मट आणि अरेरावीच्या भाषेत संघटनेच्या जिल्हा कार्यवाहचा अपमान करून संघटनेवार दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मुजोर कर्मचाऱ्यावर कार्यवाही करण्यासाठी विदर्भ खाजगी प्राथमिक शिक्षक संघ व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना गुरुवारी संयुक्त निवेदन दिले.

नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होणाऱ्या शिक्षकांना सेवानिवृत्तीच्या दिवशी पेन्शन तसेच इतर आर्थिक लाभ मिळण्याच्या दृष्टीने चार ते सहा महिने आधीच सेवा निवृत्ती प्रकरणे शिक्षण विभागात सादर केली जातात. मात्र शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्त प्रकरणाचे कोणतेही गांभीर्य नसल्याने मुद्दाम प्रकरणे पाडून ठेवतात, त्यामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वेळेवर आर्थिक लाभ मिळत नाही.

खाजगी शाळांतील सेवानिवृत्ती प्रकरणांसंबंधित महिला समाज शाळेतील शिक्षिका मंगला लांबट यांचे सेवानिवृत्त प्रकरणाची सध्यास्थिती विचाराली असता. महेश तिजारे यांचा संयम सुटला आणि माज्याकडे भरपूर कामे आहेत. मला वाटेल तेव्हा सेवानिवृत्ती प्रकरणे काढेन, शिक्षणाधिकारी साहेबांना सांगा, ते काय करतील, मी पाहून घेईन, तुमच्याने जमते ते करा, अशी उडवा उडविची उत्तरे दिली. यावेळी येणाऱ्या फेब्रुवारीत सेवानिवृत्त होणारे संत शिवाराम प्राथमिक शाळेचे देवचंद चौधरी उपस्थित होते, शिक्षक संघटना लोकशाही मार्गाने शिक्षकांचे प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम करतात. मात्र संघटनेच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांना अपमानजनक वागणूक मिळत असेल तर इतर सामान्य शिक्षकांचे काय? असा सवाल निर्माण झाला आहे.

सेवा निवृत्त प्रकरणे महालेखागार कार्यालयाकडे सादर करण्यासाठी संबंधित कर्मचारी सेवा निवृत्त होणाऱ्या प्रत्येक शिक्षकांकडून प्रत्येकी पाचशे ते हजार रुपये वसूल करतात, त्याशिवाय सेवा निवृत्ती प्रकरणाला हात लावत नसल्याची दबक्या आवाजात शिक्षकीय वर्तुळात चर्चा आहे.

निवेदन देतेवेळी विमाशिचे जिल्हाध्यक्ष सुधाकर देशमुख, प्राथमिकचे जिल्हा कार्यवाह राजेश धुर्वे, धीरज बांते, जिल्हाध्यक्ष दारासिंग चव्हाण, कार्यवाह प्रभाकर मेश्राम, ईश्वर बावणे, शिलवंतकुमार मडामे, टिंकेश लांजेवार, विलास खोब्रागडे इत्यादी उपस्थित होते.

# रेती तस्करी करणारा ट्रॅक्टर पकडला

■ ७ लाख ६ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त ■ स्थानिक गुन्हे शाखा पथकाची कारवाई



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**भंडारा :** पालांदुर पोलिस ठाण्याचे हद्दीत अवैध रेती वाहतूकीसह इतर अवैध व्यवसायांवर कारवाई करण्याकरिता भंडारा येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस आपले पथकासह पट्रोलिंग करीत असताना निळ्या रंगाचा स्वराज कंपनीचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर व विना क्रमांकाच्या लाल रंगाच्या ट्रॉलीने चुलबंद नदी परिसरातील पात्रातून विना परवाना विना पास रेतीची अवैद्य वाहतूक करतांना गुरूवारी (ता.८ जानेवारी) रोजी सकाळी ७ वाजता दरम्यान मिळून आल्याने ट्रॅक्टर चालकावर पालांदूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ७ लाख ६ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उमेश अशोक गभणे (३२ वर्ष) रा. गुरढा, ता.लाखनी असे आरोपीचे नाव आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षक नुरुल हसन यांनी अवैध धंद्यावर अंकुश लावण्याकरिता भंडारा येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस कर्मचाऱ्यांना आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार जिल्हाभरातील सर्वच पोलीस ठाणे हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांची पेट्रोलिंग अहोरात्र सुरू आहे. गुरुवारी सकाळच्या सुमारास पालांदूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील डोंगरगाव मुरमाडी परिसरात स्थानिक गुन्हे शाखा उपविभाग-साकोली पोलीस पथकातील कर्मचारीं पेट्रोलिंग करीत असताना सकाळी ७ वाजता दरम्यान ट्रॅक्टर चालक उमेश गभणे हा निळ्या रंगाचा स्वराज कंपनीचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर व सोबत जोडलेली लाल रंगाची विना क्रमांकाची ट्रॉली व एक ब्रास रेती असा एकुण ७ लाख ६ हजार रुपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष घटनास्थळावरून जप्त करून अवैध रेती वाहतूक पर्यावरणाचे नुकसान करण्याच्या उद्देशाने शासनाचा महसूल बुडवितांना मिळून आल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पो.हवा.सुनील ठवकर, यांच्या फिर्यादीवरून पालांदूर पोलिसांनी ट्रॅक्टर चालक याचे विरुद्ध अपराध क्रमांक ०५/२०२६ कलम ३०३(२), भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस ठाणे पालांदूरचे ठाणेदार सतीश बन्सोड यांचे मार्गदर्शनात सुरू आहे.

# भंडाऱ्यात आरटीओचे रस्ता सुरक्षा अभियान;१०१ जणांची नेत्र तपासणी



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**भंडाराः** 'सडक सुरक्षा-जीवन रक्षा' हे ब्रीदवाक्य समोर ठेवून उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा यांच्या वतीने आज दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी विशेष 'नेत्र व आरोग्य तपासणी' शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण १०१ नागरिकांनी सहभाग नोंदवला.

वाहन चालवताना दृष्टी सुस्पष्ट असणे हा रस्ता सुरक्षेचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. हीच गरज ओळखून रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत आयोजित या शिबिरात तज्ञ डॉक्टरांच्या पथकामार्फत आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने तपासणी करण्यात आली. दिवसभरात झालेल्या या चाचणीत एकूण १०१ लोकांची तपासणी झाली ज्यामध्ये ३२ लोकांच्या डोळ्यांत विविध प्रकारचे दोष आढळून आले. या सर्वांना उप प्रादेशिक परिवहन कार्यालया मार्फत पुढील उपचार व चष्म्याचा वापर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.या शिबिराप्रसंगी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सतीश जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मोटार वाहन निरीक्षक वैभव गुल्हाने, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक सागर सराफ, मेघाराणी काशिद, आणि गुलशन चौरे यांनी शिबिराच्या नियोजनात सक्रिय सहभाग घेतला. रस्त्यावरील अपघात टाळण्यासाठी वाहन चालकांनी वेळोवेळी आपली आरोग्य तपासणी करून घेणे आवश्यक आहे, असे आवाहन या प्रसंगी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सतीश जाधव यांनी केले.

## विष प्राशनाने तरूणाचा मृत्यू

**भंडारा :** लाखनी जवळील गडेगाव येथील सुरज देवचंद निंबार्ते (३०) याने दि.६ जानेवारी रोजी विष प्राशन केले. विष प्राशनानंतर याची माहिती त्याने भाऊ अविनाश याला फोनवरून सांगितले. माहिती होताच वडील देवचंद निंबार्ते व सुरज याचा मित्र यांनी त्याला स्मशानभूमी परिसरातून आणून लाखनी येथील एका खाजगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला भंडारा येथील खाजगी रुग्णालयात नेण्यात आले. तेथे त्याचेवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असताना त्याच दिवशी सुरज याचा मृत्यू झाला.

## भंडारा जिल्ह्यात कलम ३७ लागू

**भंडारा :** १४ जानेवारी रोजी मकरसंक्रात साजरी करण्यात येणार आहे.त्याअनुषंगाने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी होण्याची शक्यता असल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) लागू करण्यात आले आहे. हा आदेश ०८ जानेवारी, २०२६ रोजी दुपारी १ वाजेपासून १५ जानेवारी, २०२६ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत लागू राहणार आहे. आदेशानुसार सार्वजनिक ठिकाणी शस्त्र बाळगणे, मिरवणुका, घोषणाबाजी, जमाव जमविणे यावर बंदी घालण्यात आली आहे.अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी मनोहर चव्हाण यांनी हा आदेश जारी केला असून उल्लंघन करणाऱ्यांवर फौजदारी कायद्यान्वये कठोर कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# उत्साहपूर्ण वातावरणात क्रीडा सांस्कृतिक महोत्सवाची सांगता

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**मोहाडी :** तालुक्यातील जांब केंद्रआंतर्गत शालेय क्रीडा सांस्कृतिक महोत्सव जि.प. शाळा सालई खुर्द येथे पार पडला. या त्रिदिवसीय महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम तसेच प्रेक्षणीय कवायत आणि मैदानी खेळ, जसे की, कबड्डी, खो-खो, घेण्यात आले. केंद्र प्रमुख नरेंद्र उरकुडे स्वतः उपस्थित राहून सर्व नियोजन केले आणि तीनही दिवस उपस्थित राहून क्रीडा सत्र अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडले.

समारोप कार्यक्रमात बक्षीस वितरण करण्यात आले. बक्षीस वितरकस्थानी माजी आमदार चरण वाघमारे, तर अध्यक्षस्थानी सरपंचा अनिता पटले हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ता अमित मेश्राम, उपसरपंच लक्ष्मीकांत सव्वालाखे, अध्यक्ष लालचंद ठाकरे, उपाध्यक्ष ज्योती मांढरे, शिक्षक ज्ञानेश्वर दमाहे,माजी मुख्याध्यापक गुलाब आव्हाड,ग्रा.प.सदस्य शिवदास पटले, नंदलाल लिल्हारे, एमरीत ठाकरे, सुनील ठाकरे, गोपाल लिल्हारे, ढेकल ठाकरे, प्यारेलाल दमाहे, विलास ठाकरे, नितीन लिल्हारे, विजय पटले, ज्योती अठराहे, भाग्यश्री कोहरे, कंचना ठाकरे, तेजेश्वरी पटले प्रभा वरठे, अलिशा वाघमारे, दुर्गा चवरे, शामकला मांढरे, सुनिता राणे, सुरेखा दमाहे, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

सर्व विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते मेडल, सन्मानचिन्ह व पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट कामगिरी करणऱ्या शिक्षकांचाही मेडल आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव झाला. कार्यक्रमाच्या यशासाठी शाळा समिती, ग्रामपंचायत, शिक्षक व गावकऱ्यांचे यांनी योगदान दिले. क्रीडा महोत्सवाचे संचालन केंद्र प्रमुख नरेंद्र उरकुडे यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक भुरे यांनी मानले.कार्यक्रमास सर्व शाळेतील मुख्याध्यापक वाय.जी. भुरे, दिनेश चिंधालोरे, एम.एन. सहारे. अवंतिका शर्मा, व्ही.एस. बोंदरे, गजानन बावणे, दिनेश गायधने, कुमारी स्वाती होळंबे, उमेश सिंगनजुडे, सुनिल लांबकाने, मनोज सव्वालाखे, सर्वश्री पंचकमेटी, शिक्षक कर्मचारी, यांच्यासह शालेय विद्यार्थी व नागरिक यांचा सुद्दा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान दिले.

यावर्षी शालेय क्रीडा सांस्कृतिक महोत्सव आयोजित करताना अनेक अडचणी आल्या. परंतु या अडचणींवर मात करून केंद्र प्रमुख नरेंद्र उरकुडे, मुख्याध्यापक भुरे, मुख्यध्'ापक वा.जी.भुरे, शिक्षक व्ही. बी. ठवकर, डी.एस.हाके, युनूस कुरेशी, शिक्षिका एस.ए.गोंडाने, एस.एस. अडसूळ, एस.जी.आव्हाड, बबिता लिल्हारे, राकेश मेश्राम, शाळा समिती, ग्रामपंचायत व गावकऱ्यांनी सहभाग घेतला. केंद्र स्तरीय क्रीडा व सांस्कृतिक सत्र अत्यंत यशस्वीपणे व नियोजनबद्ध राबविण्यात यश आले.

## सावरी येथे तीन दिवसीय संयुक्त जयंती महोत्सव

**जवाहरनगर :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त समता विचार मंच, इंदिरानगर सावरी यांच्या वतीने वर्ष ८ वा संयुक्त जयंती महोत्सव दि. १० ते १२ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. हा तीन दिवसीय कार्यक्रम अंगणवाडी जवळील पटांगण, इंदिरानगर सावरी येथे पार पडणार आहे.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी (दि. १० जानेवारी) सकाळी ९ वाजता सामूहिक प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. सायंकाळी ४ वाजता भीमगिरी पहाडी, राजेदहेगाव येथून ढोल-ताशा, लेझीम, दांडपट्टा या पारंपरिक खेळांच्या गजरात समता मिरवणूक निघणार आहे. दि. ११ जानेवारी सायंकाळी ६ वाजता शरणंम डान्स ग्रुप यांचा सांस्कृतिक कार्यक्रम तर रात्री ८ वाजता प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी कव्वाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



## केसलवाडा ग्राम पंचायत तर्फे नगराध्यक्षा मधुरा मदनकर यांचा सत्कार

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**भंडारा :** शहरालगत असलेल्या ग्राम पंचायत केसलवाडा येथे भंडारा नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा मधुरा मिलिंद मदनकर यांच सत्कार कार्यक्रम पार पडला.

याप्रसंगी केसलवाडा ग्रामपंचायत चे सरपंच जयराम (आशु) वंजारी, उपसरपंच भावना बागडे, ग्रा.पं. सदस्या शोभाताई देवेकर, ग्रा.पं. सदस्या आरती रंगारी,ग्रा.पं. सदस्या सुनंदा बडवाईक,ग्रा.पं. सदस्या कृतीका हत्तीमारे,ग्रा.पं. सदस्या संदिप आकरे, ग्रामपंचायत अधिकारी सतिश सेलोकर, ग्राम रो. सहाय्यक रोशन उरकुडे, शिपाई सचिन आकरे, कारकुन निखिल भुरे , प्रतिष्ठित नागरिक जयदेव बडवाईक तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# सरपंचावर जीवघेणा हल्ला; दोषींवर कारवाई करा!

## अन्यथा सरपंच संघटनेचे जिल्हाभर आंदोलन



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी
**आंधळगाव/वडेगाव :** मोहाडी तालुक्यातील वडेगाव येथील लोकनियुक्त सरपंच ईश्वर माटे यांच्यावर दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी शासकीय आदेशानुसार सुरू असलेल्या अतिक्रमण पाहणीदरम्यान झालेल्या जीवघेण्या हल्ल्याने भंडारा जिल्हा हादरून गेला आहे. या धक्कादायक घटनेमुळे जिल्ह्यातील सरपंचांमध्ये प्रचंड संताप उसळला असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीवर शासकीय कामकाज सुरू असतानाच हल्ला होणे ही अत्यंत गंभीर बाब असून, याचे पडसाद संपूर्ण जिल्ह्यात उमटले आहेत.

सदर अतिक्रमण पाहणी ही मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या उपस्थितीत सुरू असलेली अधिकृत शासकीय कार्यवाही होती. शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करताना लोकनियुक्त सरपंचावर हल्ला होणे म्हणजे केवळ एका व्यक्तीवर केलेला हल्ला नसून, तो लोकशाही व्यवस्थेवर, ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेवर आणि संपूर्ण शासकीय यंत्रणेलाच दिलेले उघड आव्हान असल्याचा ठपका सरपंच संघटनेने ठेवला आहे. जर शासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीतच लोकप्रतिनिधी सुरक्षित नसतील, तर सामान्य जनतेच्या सुरक्षेचे काय, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

या गंभीर घटनेच्या निषेधार्थ आज भंडारा जिल्हा सरपंच संघटनेच्या वतीने जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाला निवेदने सादर करण्यात आली. भंडारा जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, तहसीलदार तसेच संबंधित पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांना स्वतंत्रपणे निवेदने देऊन दोषींवर तात्काळ व कठोर कारवाईची मागणी करण्यात आली. केवळ चौकशीच्या नावाखाली वेळकाढूपणा सहन केला जाणार नाही, असा ठाम पवित्रा यावेळी सरपंच संघटनेने घेतला.

निवेदन सादर करताना सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष भूपेंद्र गौरीशंकर नागफासे, जिल्हा सरपंच संघटनेचे सचिव पारस भुसारी, तसेच राजेश हटवार,. महेश गभने, गुड्डु बांते यांच्यासह भंडारा जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील मोठ्या संख्येने सरपंच उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्व सरपंचांनी प्रशासनाच्या ढिसाळ भूमिकेवर तीव्र शब्दांत टीका करत, सरपंचांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आणला.

निवेदनामध्ये संबंधित आरोपींवर जीवघेणा हल्ला, शासकीय कामात अडथळा, मारहाण, धमकी व गंभीर स्वरूपाच्या अन्य कलमांखाली तात्काळ गुन्हे दाखल करून अटक करण्याची ठाम मागणी करण्यात आली आहे. दोषींना पाठीशी घालणाऱ्यांवरही कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सरपंच संघटनेने लावून धरली आहे. तसेच भविष्यात अतिक्रमण कारवाई किंवा तत्सम शासकीय कामकाजादरम्यान सरपंच व शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी सक्तीचा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात यावा, ही मागणीही करण्यात आली.

याशिवाय अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी जिल्हास्तरीय ठोस कार्यपद्धती (रडढ) तातडीने तयार करून तिची कडक अंमलबजावणी करण्यात यावी, अशी स्पष्ट मागणी सरपंच संघटनेने केली आहे. सरपंच हे गावपातळीवरील शासनाचे महत्त्वाचे दुवा असून, त्यांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करणे म्हणजे संपूर्ण प्रशासन व्यवस्थेलाच कमजोर करण्यासारखे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

सरपंच संघटनेने प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, या प्रकरणात दोषींवर तात्काळ व कठोर कारवाई झाली नाही, तर भंडारा जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील सरपंच संघटना लोकशाही मार्गाने पण तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यास बाध्य होतील. वेळ आली तर रस्त्यावर उतरून प्रशासनाला जाग आणली जाईल, असा स्पष्ट इशाराच यावेळी देण्यात आला आहे. लोकशाही, ग्रामस्वराज्य आणि लोकप्रतिनिधींच्या सन्मानासाठी हा लढा शेवटपर्यंत लढला जाईल, असा निर्धार सरपंच संघटनेने व्यक्त केला आहे.

## जाहीर सुचना

**'नायलॉन मांजा बंदी बाबत'**
**पर्यावरणपूरक सण-पर्यावरणाचे संरक्षण...**

नगर परिषद साकोली-सेंदुरवाफा क्षेत्रातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ यांनी सुमो मोटो जनहित याचिका क्र.१ सन २०२१ या प्रकरणात दि.२४/१२/२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार नायलॉन मांजा/चायनीज मांजाचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक , हाताळणी व साठवणुकीवर केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयामार्फत संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे.

नायलॉन मांजा/चायनीज मांजाचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक , हाताळणी व साठवणुक करणारे असे व्यक्ती/विक्रेता हे कायदेशीर तथा दंडास पात्र राहील. तरी पर्यावरणाचे संरक्षण लक्षात घेता,आपले सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे करावेत व नगर परिषदेस सहकार्य करावे.

आदेशान्वये
मुख्याधिकारी
नगर परिषद साकोली-सेंदुरवाफा

# उद्योजकांनी बदलत्या बाजारपेठेनुसार नवनवीन संधीचा लाभ घ्यावा - जिल्हाधिकारी वान्मथी सी

## जिल्हास्तरीय ईग्नाईट कार्यशाळेचे उद्‌घाटन




■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०८**

ग्रामीण भागातील उद्योजकांनी प्रामुख्याने ब्रँडींग व विपणन याच्याशी संबंधित बाबींवर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. बाजारपेठेत अधिक प्रभाविपणे सहभागी होण्यासाठी बदलत्या बाजारपेठेतील नवनवीन संधी तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना व उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले.

जिल्हा उद्योग केंद्राच्यावतीने जिल्ह्यातील उद्योजकांसाठी जिल्हस्तरीय ईग्नाईट महाराष्ट्र २०२६ या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेच्या शुभारंभाप्रसंगी जिल्हाधिकारी बोलत होत्या. यावेळी उद्योग सहसंचालक, एमआयडीस औद्योगिक संघटना, लघु उद्योग भारती, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, रिझर्व बँक व्यवस्थापक, डीजीएफटी, आयडीबीआय बँक, न्यु इंडिया इन्शुरन्स, आयबीएफसी, महास्ट्राईड, नाबार्ड व आरसेटीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. नागपूर विभागाच्या उद्योजक सहसंचालकांनी ३१ डिसेंबर २०२५ रोजी जाहिर केलेल्या नवीन औद्योगिक धोरण अंतर्गत उद्योग विकासाची रुपरेखा सादर केली. जिल्ह्यातील निर्यातीबाबत आढावा घेऊन निर्यात उद्योग कसे वाढवता येईल तसेच उद्योग विभागाच्या विविध योजनांबांबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेस उद्योग संचालनालयाच्या मैत्री कक्षामार्फत व्हीसीद्वारे मैत्री कायदा २०२३ व त्याअंतर्गत उद्योग सुलभीकरणासाठी महाराष्ट्र शासनाद्वारे सुरु करण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. यावेळी केंद्र शासनाच्या झेड उपक्रमामध्ये नोंदणी करण्याची सेवा उपलब्ध करुन देण्यात आली व प्रमाणपत्र देण्यात आले. उद्यम नोंदणी आणि आयात निर्यात प्रमाणपत्र नोंदणी देखील यशस्वीरित्या करुन घेण्यात आली. कार्यशाळेच्या अंतर्गत भरण्यात आलेल्या प्रदर्शनामध्ये राज्य शासनाचे सीएमईजीपी, पीएमएफएमई कार्यक्रम तसेच आरसेटी अंतर्गत लाभार्थ्यांच्या विविध उत्पादनाचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. कार्यशाळेमधील उल्लेखनीय फलनिष्पती म्हणुन महास्ट्राईड मार्फत जिल्ह्यातील कृषि उद्योग विकासाच्या संधीबाबत चर्चा करण्यात आली. विविध उद्योजकता विकास या विषयावर आयआयएमचे मेंनटर तनवीर मिर्जा व अंकुर अग्रवाल यांनी उद्योजकांना मार्गदर्शन केले. यासोबत उद्योग विकासातील वित्त, बँक, विमा, उद्योजकता विकास व निर्यात क्षेत्रातील संधी या विषयावर तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेचा जिल्ह्यातील ३५० पेक्षा जास्त उद्योजकांनी सहभाग घेऊन लाभ घेतला. आभार भागवत गाडेकर यांनी मानले.

# कानगाव ते आजनसरा भाविकांची पायदळ वारी



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**गाडेगाव, दि. ०८**

हिंगणघाट तालुक्यातील कानगाव, नांदगाव, गाडेगाव, चाणकी, येथील नागरिक दर बुधवारला कानगाव ते आजनसरा येथे पैदल वारी करीत असून या भाविकांचे चाणकी, भगवा, सिरसगाव, निधा टाकळी या गावातील नागरिकांकडून स्वागत करण्यात आले.

कडाक्याच्या थंडीची पर्वा न करता भोजाजी महाराजांवर असलेली अखंड श्रध्दा आणि भक्तीत वारकरी वाहून निघत असून सध्या तीनशे ते चारशे नागरीक या वारीमध्ये जात असून दर बुधवारला ही संख्या वाढत असल्याचे आयोजक त्र्यंबक तळवेकर यांनी सांगितले. विदर्भाची पंढरी म्हणून आजनसरा येथे केवळ विदर्भातीलच नव्हे तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक मोठ्या संख्येने येतात सध्या चंद्रपूर वरोरा हिंगणघाट आणि काटोल येथील आगाराच्या बसेस सुरू असून देवळी पुलगाव, यवतमाळ आणि वर्धा आगाराची अडेगाव कानगाव मनसावळी सिरसगाव अशी बस सेवा सुरू करावी अशी मागणी कानगाव परिसरातील भाविक मंडळींनी केली आहे. या मार्गावरून आजनसरा येथे जाण्यासाठी बससेवा नसल्याने नागरिकांना खाजगी वाहनातून जादा पैसे देवून प्रवास करावा लागत आहे, या भागातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी या समस्येकडे लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## डेपोतील चोरीची रेती भरलेली ट्रॅक्टर जप्त

**वर्धा, :** मांडगाव येथील शासकीय डेपोतून चोरीची रेती भरलेला ट्रॅक्टर महसूल विभागाच्या पथकाने पकडून जप्त करीत समुद्रपूर तहसील कार्यालय परिसरात लावण्यात आला,

याप्रकरणी एकावर हिंगणघाट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, मांडगाव येथील संत ब-हाणपुरे जिनिंग प्रेसिंग ऑइल मिल तेथे शासकीय रेती डेपो आहे, तेथे मंडळ अधिकारी प्रसाद पाचखेडे यांच्या नेतृत्वातील पथक तपासणीसाठी गेले होते, दरम्यान, तेथे रेतीची चोरी करुन ट्रॅक्टरमध्ये भरत असल्याचे निदर्शनास आले, त्यावरुन ट्रॅक्टर जप्त करत करुन तहसील कार्यालयात जमा केला, पुढील तपास सुरू आहे.

## जुन्या वादातून चाकूहल्ला, युवक जखमी

**वर्धा :** जुन्या वादातून चहाच्या टपरीवर झालेल्या भांडणात एकाने युवकावर चहा फेकत चाकूने हल्ला केल्याची घटना सेलू शहरातील वडगाव रोडवर घडली, या घटनेत भांडण सोडविण्यासाठी मध्यस्थी करणारा दुसरा युवक गंभीर जखमी झाला आहे, हिंगणी येथील सुजल पंढरी जुगनाके (१८) हा आपला मित्र निकेश कोकडे यांच्यासोबत वडगाव रोडवरील एका चहाच्या टपरीवर चहा पित होता, त्यावेळी सुकळी(स्टेशन) येथील १७वर्षीय अल्पवयीन तेथे आला, जुन्या वादावरुन त्याने सुजलसोबत वाद घालण्यास सुरुवात केली, यावेळी त्याने शिवीगाळ करत सुजलवर चहा फेकला, वाद वाढल्यानंतर आरोपीने फोल्डिंग चाकू काढून सुजलवर हल्ला केला, त्याचवेळी भांडण सोडविण्यासाठी निकेश कोकडे मध्यस्थी करण्यास पुढे आला असता, चाकूचा वार त्याच्या हातावर बसून तो गंभीर जखमी झाला, घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरुन फरार झाला, याप्रकरणी जखमी युवकाने सेलू पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली, त्या तक्रारीवरुन गुन्हा नोंद करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

## जुना वाद, दोघांनी एकास बदडले

**वर्धा, :** जुन्यावादातूनयुवकाला दोघांनी बदडले, ही घटना वडगाव रोड येथे घडली, मयूर प्रफुल्ल थूल (१८)रा. सुकळीस्टेशन हा चहाच्या दुकानात चहा पित असताना सुजल पंढरी जुगनाके आणि पांडया नामक युवक तेथे आले, आणि मयुरला धक्का मारून चहा खाली पाडला, तसेच जुन्या वादाच्या कारणातून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारले, सुजलने हातातील कडयाने कानावर व डोक्यावर मारून जखमी केले, याप्रकरणीसेलूपोलिसाततक्रार दाखल करण्यात आली.

## सोशालिस्ट चौकात भरधाव दुचाकीच्या धडकेत वृद्ध जखमी

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०८**

शहरातील सोशालिस्ट चौकात भरधाव दुचाकीने दिलेल्या धडकेत दत्तराज नत्थुजीठवरे(८६)रा. मालगुजारीपुरा, वर्धा हे गंभीर जखमी झाले, दत्तराज ठवरे हे सोशालिस्ट चौकातील हनुमान मंदिरात दर्शनघेऊनएम.एच. ३२, बी.ए. ३३४६ क्रमांकाच्या दुचाकीने धडक दिली, यात ठोंबरेहेखालीपडल्यानेजखमीझाले, त्यांना तत्काळजिल्हा सामान्यरुग्णालयातदाखल केले, तेथे प्रथमोचार करुन सावंगी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, याप्रकरणी अक्षय प्रशांत मानकर (२७) यांच्या तक्रारीवरुन शहर पोलीस ठाण्यात धडक देणारा दुचाकीस्वार पृथ्वीराज चव्हाण (३२) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# शिवसेना महिला आघाडीची शहर कार्यकारिणी जाहीर



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०८**

शिवसेना प्रणित महिला आघाडीची शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. शिवसेना विभागीय कार्यालयात महिला आघाडी जिल्हाप्रमुख शुभांगी ठमेकर यांचे अध्यक्षतेत महिला आघाडी ची बैठक पार पडली. या बैठकीला जिल्हाप्रमुख राजेश सराफ यांची उपस्थिती होती. या बैठकीत वर्धा शहर व ग्रामीण भागातील महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या खालीलप्रमाणे नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. यामध्ये शहर प्रमुख मयुरी गांधी, उप-शहर प्रमुख रंजना पट्टेवार, अगस्ता शेंडे, वर्षा वंजारी, सुनीता सोनवणे, सुनीता पांढरे, शहर समन्वयक कोमल मुरमे, धनश्री थोरात, प्रभाग प्रमुख

कविता भूतडा, स्नेहल काचोलिया, लिना जमणारे, कविता घवघवे, सुनीता शुक्ला, नलिनी आत्राम, कविता जोशी, ममता दुबे, उप-तालुका प्रमुख सीमा कोटनाके, सेवाग्राम जिल्हा परिषद सर्कल प्रमुख, शुभांगी खपली आदींची नियुक्ती करण्यात आली. बैठकीला उपजिल्हा प्रमुख मिलन गांधी, शहर समन्वयक धरम शेंडे, कान्हा यादव, बाळा थोरात सहित शिवसेनेचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# सोशल मीडियाचा वापर करतांना विद्यार्थ्यांनी सतर्क राहणे गरजेचे - कांबळे

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**भिडी, दि. ०८**



सोशल मीडियाचा वापर करतांना विद्यार्थ्यांनी सतर्क व अद्यावत राहणे गरजेचे आहे. आधुनिक राहणीमान, शिक्षकांप्रती असलेला आदर, आई-वडिलांची सेवा, सोशल मीडियाचा वाढता वापर, मोबाईलमुळे वाढलेला ताणतणाव तसेच मोबाईलचा वापर करतांना दक्ष राहणे आवश्यक आहे की, प्रत्येक व्यक्तीने समाजऋण फेडले पाहिजे असे सांगून आधुनिक राहणीमान, मोबाईलमुळे वाढलेला ताणतणाव, सायबर गुन्हे, ऑनलाईन फसवणूक, फेक लिंक बाबतीत सतर्क व अद्यावत राहणे अत्यंत गरजेचे आहे. असे विचार विनोद कांबळे यांनी व्यक्त केले.

येथील यशवंत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात पोलीस विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांवरील शारीरिक अत्याचार व इतर गुन्हे रोखण्यासाठी पोलिस विभागाने 'पोलिस दीदी, काका' या उपक्रमाच्या अंतर्गत विद्यार्थी सुरक्षा व सुरक्षितता कार्यशाळा आयोजीत करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य अनिल ढांगे यांची उपस्थीती होती तर प्रमूख मार्गदर्शन म्हणून विनोद कांबळे प्रफुल्ल कोडापे प्रा. अरविंद राठोड, प्रा. विश्वंभर कमठेवाड आदी उपस्थित होते. प्रा. अरविंद राठोड यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की, विद्यार्थ्यांनी विद्यार्थीदशेत सायबर गुन्ह्यापासून दूर राहिल्याने त्यांचा शैक्षणिक, सामाजिक आणि भविष्याचा विकास सुनिश्चित होइल. तसेच सतर्क राहिल्याने विद्यार्थी त्यांच्या अभ्यासात चांगले लक्ष केंद्रित करू शकतात, म्हणूण डिजिटल युगात विद्यार्थ्यांनी सतर्क आणि अद्यावत राहणे अत्यंत गरजेचे आहे. सतर्क राहिल्याने विद्यार्थ्यांवरील शारीरिक अत्याचार व इतर गुन्हे रोखण्यासाठी पोलिस विभागाने 'पोलिस दीदी, काका' हा उपक्रम सुरू केला आहे. या माध्यमातून स्थानिक पोलिस थेट शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना, सोशल मीडियाचा वाढता वापर, मोबाईलमुळे वाढलेला ताणतणाव, आजचा विदयार्थी हा उद्याचा जबाबदार नागरिक आहे, वेळेचे नियोजन योग्य प्रकारे केले तर ते कोणत्याही अनपेक्षित संकटांपासून स्वतः चे रक्षण करू शकतात. तसेच काळाच्या घडीशी अद्ययावत राहणे म्हणजे नवीन तंत्रज्ञान, ज्ञान आणि सामाजिक परिस्थिती समजून घ्यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले. सतर्क राहिल्याने विद्यार्थी त्यांच्या अभ्यासात चांगले लक्ष केंद्रित करू शकतात. असे प्रा. अरविंद राठोड यांनी मार्गदर्शन करताना आपले विचार मांडले. संकटकाळात कुठे अन् कशी मागायची मदत? या विषयावर प्रफुल्ल कोडापे यांनी मार्गदर्शन करताना आपले विचार मांडले. संकटकाळात विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता तत्काळ मदत मागणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी मोठ्याने आवाज करणे, जवळच्या पोलिस ठाण्याला किंवा डायल ११२ वर त्वरित फोन करणे, दामिनी पथकाची मदत घेणे किंवा जवळच्या विश्वासू व्यक्ती किंवा शिक्षकांची मदत घेणे, हे महत्त्वाचे आहे. कार्यक्रमाचे संचालन प्रा. राजेश जोगळे यांनी केले तर आभार प्रा. विश्वंभर कमठेवाड यांनी मानले. निलेश लाभे यांचे सहकार्यालाभले आणि शेवटी राष्ट्रगीत घेऊन कार्यक्रमांची सांगता करण्यात आली.

# जिल्हयात सावित्री फुले जयंती साजरी

## कात्री येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वडनेर, दि. ८**

कहीं हम भूल न जायें अभियाना अंतर्गत सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त राजरत्न बुद्ध विहार, कात्री येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष शरद भगत, प्रमुख मार्गदर्शक ॲड. अतुल पाटील, ॲड. अश्विनी मून, नागपूर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन शीतल चहारे यांनी केले. याप्रसंगी महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी आधुनिक भारतात शिक्षण क्षेत्रात सुरू केलेल्या परिवर्तनवादी चळवळ व त्यांचा संघर्ष व त्यानंतर या परिवर्तनवादी चळवळीला छत्रपती शाहूजी महाराज व डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी कसे पुढे नेले, या महापुरुषांचा त्याग, संघर्ष आणि योगदान, याबद्दल मार्गदर्शकांनी माहिती दिली. कार्यक्रमाला नागरिकांची उपस्थिती होती.

## सावित्रीबाई जयंतीनिमित्त आरोग्य तपासणी



**वडनेर, दि. ०८**

प्रत्येकांचे आरोग्य सदृढ व निरोगी राहावे या उदात्त हेतूने बालिका दिन म्हणून साजरा करण्यात येणाऱ्या सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त शिरजगाव (बाजार) येथे महिलांची व किशोरवयीन मुलींची आरोग्य तपासणी करण्यात आली. माविम उडान लोकसंचालित साधन केंद्र हिंगणघाट द्वारे हा उपक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला माजी सरपंच राजू मंगेकर, पोलीस पाटील संजय शेलकर, डॉ. कल्याणी बागडे, आरोग्य सेविका पोर्णिमा थुल (वनकर), आचल वाघ, तुषार वैद्य, उडान लोकसंचालित साधन केंद्राच्या सहयोगनी शारदा हाडके, यांच्या उपस्थितीत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून सावित्रीबाईंच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकण्यात आला, त्यांनी महिलांसाठी केलेले अपारकार्य आजच्या महिलांनी अंगीकारावे असे मत माजी सरपंच राजू मंगेकर यांनी व्यक्त केले. त्यानंतर येथील महिला व किशोरवयीन मुलींची नि:शुल्क आरोग्य तपासणी करण्यात आली, यामध्ये रक्त तपासणी, हाडांची झीज, मणक्याचे आजार, बदलत्या जीवनशैलीमुळे बाताचे आजार, अस्थिरोग आदींची तपासणी करून योगा प्राणायाम, व्यायाम करण्यासंदर्भातील माहिती महिला व किशोरवयीन मुलींना देण्यात आली. कार्यक्रमाला आशा सेविका सविता येसंबरे, मंगला बागेश्वर, सीआरपी सारिका धनविज, दीपाली वाघ, प्रियंका वाघ यांच्यासह महिला व किशोरवयीन मुलींची उपस्थिती होती.

# कबड्डी स्पर्धेत ट्रिपल एस.के. संघ विजेता

## जुनोना संघ द्वितीय स्थानी



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**सिंदी (रे), दि. ०८**

नजिकच्या दहेगांव येथील विठ्ठल रुक्मिणी देवस्थान परिसरात महाकाल स्पोर्टिंग क्लब द्वारा आयोजित ५२ किलो वजन गटातील कबड्डी स्पर्धेचे विजेतापद श्री क्षेत्र पळसगांवच्या ट्रिपल एस.के. संघाने पटकावले. उपविजेता जुनोना येथील चमू ठरली.

मंगळवारी सायंकाळी हेलोडीचे सरपंच सागर भगत, डॉ. सुरेश धंदरे आणि शेकडोंच्या हजेरीत पळसगांवच्या चमुला १०हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक (आम. कुणावार पुरस्कृत) आणि पवार बंधूंकडून १हजार ५१ रु. रोख प्रदान करण्यात आले. जुनोना स्पोर्टिंग क्लबला ७हजार१रु. रोख व वैयक्तिक तृतीय पारितोषिक केळझरच्या संघाला ५हजार१रू. शिवाय आयोजक मंडळ महाकाल स्पोर्टिंग क्लब दहेगाव (गो)चमुला प्रोत्साहनपर ३हजार १रु. देण्यात आले. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेतील बक्षीस वितरणाला सागर भगत, सुरेश धंदरे, उमेश राऊत, सचिन महाबुधे, अमोल पिठाले, मंगेश तिजारे, बेलदार समाज अध्यक्ष अनिल चव्हाण, सोशल मीडिया (भाजपा )संजय पिसुडडे, प्रणय शेंद्रे, पोलिस पाटील मोहन कावळे, विलास आचरकाटे, विजय उरकांदे, नारसे, ईश्वर तिजारे, सुरेंद्र तिवाडे, अरूण पाटील, समीर अंबाडरे व मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# शाओमीकडून भारतात रेडमी नोट १५ ५जी आणि रेडी पॅड २ प्रो लाँच



**मुंबई, ८ जानेवारी :** शाओमी इंडिया या जागतिक तंत्रज्ञान ब्रँडने आज रेडमी नोट १५ ५जी आणि रेडमी पॅड २ प्रो यांच्या लाँचची घोषणा केली, जे दैनंदिन वापरासाठी विश्वासार्ह कार्यक्षमता, सर्वोत्तम मनोरंजन आणि दीर्घकालीन टिकाऊपणा देण्याकरिता डिझाइन करण्यात आले आहेत. भारतातील ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आलेल्या नवीन रेडमी डिवाईसेसमध्ये दिवसभर कार्यरत राहण्याची स्मार्टफोन क्षमता, तसेच मोठी स्क्रिन आहे, ज्यामुळे चालता-फिरताविनासायास कार्यक्षमता आणि घरामध्ये उत्साहवर्धक मनोरंजन व उत्पादकतेचा शोध घेत असलेल्या वापरकर्त्यांसाठी अनुकूल चॅम्पियन्स आहेत.

काम, प्रवास, पेमेंट्स, मनोरंजन व संवादासाठी सतत स्मार्टफोन्सचा वापर केला जात असलेल्या देशामध्ये रेडमी नोट १५ ५जी असा डिवाईस म्हणून डिझाइन करण्यात आला आहे, जेथे वापरकर्त्यांना खरेदी करताना इतर विचार करण्याची गरज भासणार नाही.

# सीमा ओलांडून हिंदी: भाषा, ओळख आणि नात्यांवर सोनी सब कलाकारांचे विचार



**मुंबई, ८ जानेवारी :** एका अशा जगात जिथे कथा, भावना आणि नाती खंड ओलांडून पसरतात, भाषा ही आपली सर्वात खोलवर रुजलेली मुळे ठरते. जगभरातील कोट्यवधी लोकांनी बोलली जाणारी हिंदी ही केवळ संवादाची माध्यम नाही; ती संस्कृती, इतिहास आणि अभिव्यक्तीची जिवंत परंपरा आहे जी प्रदेश आणि पिढ्यांमध्ये लोकांना एकत्र बांधते. जागतिक हिंदी दिन, जो हिंदीच्या जागतिक महत्त्वाला स्वीकारण्यासाठी आणि तिच्या समृद्धीला सीमांच्या पलीकडे नेण्यासाठी समर्पित आहे, या दिवशी सोनी सब चे प्रिय कलाकार या शाश्वत भाषेचा त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात काय अर्थ आहे यावर विचार करतात.

अविनेश रेखी, जो गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय मध्ये भगवान शिवाची भूमिका साकारतो, म्हणतो, जेव्हा मी सेटवर पाऊल ठेवतो, तेव्हा हिंदी आपोआप माझा भावनिक आधार बनते.

# एचडीएफसी बँक स्मार्ट गेटवे पेमेंट मंचाचे सीबीडीसीचे एकत्रिकरण पूर्ण

**नागपूर, ८ जानेवारी :** एचडीएफसी बँके तर्फे आज रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बँक डिजिटल करन्सी (सीबीडीसी) या डिजिटल रुपयाचे (ई रुपी) चे त्यांचा ऑनलाईन मर्चंट पेमेंट मंच असलेल्या स्मार्ट गेटवे मध्ये एकत्रिकरण करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. आता या एकत्रिकरणामुळे व्यापाऱ्यांना आता त्यांच्या ग्राहकांना सुरक्षित, शून्य खर्चात आणि सॉव्हरेन वर आधारीत डिजिटल पेमेंटचा पर्याय हा एचडीएफसी बँकेच्या चेकआऊट पध्दतींमध्येही उपलब्ध झाला आहे.

या सुधारणे मुळे स्मार्टगेटवे चे व्यापारी आता डिजिटल रुपयांच्या स्वरुपात कोणत्याही खर्चाशिवाय पेमेंट स्विकारु शकतील. त्याच बरोबर सध्याच्या यूपीआय, कार्ड्स आणि नेट बँकिंगचा वापरही त्यांना करता येणार आहे. ग्राहकांना आता अगदी लगेच आणि सुरक्षित पध्दतीचा अवलंब करुन डिजिटल पेमेंटचा समृध्द अनुभव प्राप्त करता येणार आहे.

# एअरबीएनबी इनसाइट्समधून संगीतावर आधारित अनुभव जनरेशन झीच्या प्रवासाला देतोआकार

**नागपूर, ८ जानेवारी :** तरुण भारतीयांमध्ये (जेन झी-१८-२८ वयोगटातील) प्रवासाच्या निवडींना आकार देणारी संगीत ही सर्वात शक्तिशाली शक्ती बनली आहे. एअरबीएनबीच्याएअरबीएनबी एक्स्पिरियन्स लेड ट्रॅव्हल इनसाइट्स १ मधून असे दिसून आले आहे की जेन झी लाइव्ह कॉन्सर्ट आणि उत्सवांभोवती सहलींचे नियोजन करत आहे. त्यामुळे नवीन शहरेशोधण्यासाठी, मुक्काम वाढवण्यासाठी आणि मुख्य कार्यक्रमासोबतच स्थानिक परिसराचा अनुभव घेण्यासाठी संगीत महोत्सव एक महत्त्वाचे केंद्र ठरले आहेत.

एअरबीएनबीचे भारत आणि आग्नेय आशियासाठीचे राष्ट्रीय प्रमुख अमनप्रीत सिंग बजाज म्हणाले, संगीत मैफिली आणि महोत्सवांमध्ये वाढत्या स्वारस्यामुळे एका नवीनप्रकारच्या प्रवासासाठी मार्ग मोकळा झाला आहे -जो संगीताला नवीन स्थळे शोधण्याचे प्रवेशद्वार म्हणून पाहतो. पर्यटनाचा हा नवीन प्रकार प्रवाशांच्या वर्तनाला आकार देत आहे. त्यामुळेसमूहांना एकत्र वेळ घालवता येतो. ते सहजपणे एकत्र येतात आणि संस्मरणीय अनुभव निर्माण होतात. ते एअरबीएनबीकडून देण्यात येत असलेल्या अनुभवांशी पूर्णपणे सुसंगत आहेत.

# ग्रो म्युच्युअल फंडने सादर केला 'ग्रो स्मॉल कॅप फंड'

**बेंगळूरू, ८ जानेवारी २०२६ :** ग्रो म्युच्युअल फंडने ग्रो स्मॉल कॅप फंडच्या लाँचची घोषणा केली आहे. हा ओपन-एंडेड इक्विटी फंड असून, प्रामुख्याने स्मॉल कॅप शेअर्समध्ये गुंतवणूक करणार आहे. या फंडाचा न्यू फंड ऑफर (एनएफओ) ८ जानेवारी ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत खुला राहणार आहे. शिस्तबद्ध बॉटम-अप्गुंतवणूक पद्धतीचा अवलंब करत, ग्रो म्युच्युअल फंडच्या चौकटीवर वाजवी किमतीत गुणवत्ता आणि वाढ (क्वालिटी अँड ग्रोथ अॅट अ रिझनेबल प्राइस) आधारित धोरणानुसार, उच्च दर्जाच्या आणि विस्तारक्षम स्मॉल कॅप कंपन्यांमध्ये गुंतवणूक करून दीर्घकालीन भांडवली वाढ साध्य करण्याचा या योजनेचा उद्देश आहे. भारताची अर्थव्यवस्था सध्या सर्वांगीण परिवर्तनाच्या टप्प्यातून जात आहे. भौतिक पायाभूत सुविधा, वित्तीय व्यवस्था आणि तांत्रिक क्षमतांमध्ये होत असलेली लक्षणीय सुधारणा सर्व आकारांच्या उद्योगांसाठी नव्या संधी निर्माण करत आहे.

# अविवा लाइफ इन्शुरन्सकडून स्मार्ट वाइटल्स: पहिल्यावहिल्या वेलनेस रिवॉर्डसह असलेल्या फिक्स्ड हेल्थ बेनिफिट प्लॅनचे अनावरण

अविवा इंडिया या आघाडीच्या खासगी जीवनविमा कंपनीने क्रिटिकल आजारांवर सर्वांगीण संरक्षण देणाऱ्या अविवा स्मार्ट वाइटल्स प्लॅन या इंडिव्हिज्युअल नॉन लिंक्ड, नॉन पार्टिसिपेटिंग, प्युअर रिस्क हेल्थ इन्शुरन्स फिक्स्ड बेनिफिट प्लॅनची घोषणा केली आहे. यातील पायाभूत विम्याची रक्कम १० लाख रूपये असून पॉलिसीधारकांना वेलनेस लिंक्ड स्टेप बेस्ड रिवॉर्ड्सच्या माध्यमातून विम्याच्या रकमेच्या दुप्पट व्याप्ती मिळू शकेल. ग्राहकांना त्यांच्या सरासरी रोजच्या टप्प्यांनुसार तिमाही स्वरूपात २.५%, ५% किंवा ७.५% वेलनेस रिवॉर्ड मिळू शकतात. स्मार्ट वाइटल्स प्लॅन कोणत्याही ४९ व्याप्त असलेल्या क्रिटिकल आजार आणि प्रक्रियांच्या पहिल्या निदानावर एकरकमी लाभ देतो. यात कर्करोग, मूत्रपिंड निकामी होणे, हृदयविकार, मेंदूची शस्त्रक्रिया, स्ट्रोक आणि इतर अनेक आजारांचा समावेश आहे. वेलनेस बेनिफिट्स अविवाच्या वेलनेस३६० अॅपच्या माध्यमातून तपासले जातात. तसेच पॉलिसीधारकांना आपल्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय स्मार्ट ट्रॅकिंग डिव्हाइस ९लूप बाय केअरप्लिक्स स्मार्ट रिंग) मिळू शकेल (हे फक्त अशा पॉलिसीधारकांसाठी लागू आहे ज्यांनी १५ लाख किंवा २० लाख रूपये विमा रकमेचा पर्याय निवडला आहे.)

# नागपूर विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ आज



पत्रपरिषदेत माहिती देताना डॉ. मनाली क्षीरसागर

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८**

रातुम नागपूर विद्यापीठाचा ११३ वा दीक्षांत सोहळा उद्या शुक्रवारी दुपारी ३ वाजता राजनगर येथील नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेजच्या ऑडिटोरियम सभागृहात होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी पत्रपरिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अ. भा. आयुर्विज्ञान संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनंत पांढरे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात ६१ हजार ८७१ विद्यार्थ्यांना पदवी, पदविका प्रदान करण्यात येणार आहे. त्यात स्नातक पदवीधर ४९ हजार २३० विद्यार्थी, तर स्नातकोत्तर पदवीधर १२ हजार ८७ आणि डी. लीटच्या २ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा २० हजार ३०८, वाणिज्य व व्यवस्थापन शाखा १४ हजार ६२५, मानव विज्ञान शाखा १२ हजार ४४१, आंतर विद्याशाखीय अभ्यास शाखा ५ हजार ७०९, स्वायत्त महाविद्यालये ८ हजार ५१४, पदविका प्रमाणपत्र २७३, एम आर्च बाय रिसर्च १ या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

छरीक्षेमध्ये स्पृहणीय यश संपादन केल्याबाबत १४० प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना १९४ सुवर्ण, ८ रजत आणि २७ रोख पारितोषिक असे २२९ पुरस्कार वितरित करण्यात येतील असेही डॉ. क्षीरसागर यांनी पत्रकारांना सांगितले. त्याचप्रमाणे २७९ संशोधकांना आचार्य पदवी देण्यात येणार आहे. त्यात विज्ञान व तंत्रज्ञान १२१, वाणिज्य ५८, मानवविज्ञान ८१, आंतर विद्याशाखीय १९ विद्यार्थ्यांचा समावेश आहे असेही त्यांनी सांगितले.

# घरात सुरू असलेल्या जुगार अड्डयावर धाड

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८**

गजाननगर येथील एका बंद घरात सुरू असलेल्या जुगार अड्डयावर सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाने धाड घालून ८ जुगाऱ्यांच्या ताब्यातून ७३ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सुनील पप्पू शर्मा याच्या घरी जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून पोलिसांनी धाड घातली. या धाडीत सुमीत यादव, शेख शकील, मंगेश गोरे, सचिन जगताप, अभयकुमार वासनिक, विश्वनाथ पराते, राजेश गोरिया, शारीक बेग आणि सुनील शर्मा हे जुगार खेळताना मिळून आले. आरोपींच्या ताब्यातून रोख १५ हजार १५० रुपये, ३ मोबाईल, तासपत्ते आणि इतर साहित्य असा ७३ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# सिटूतर्फे आशा दिवस साजरा




**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८**

दरवर्षीप्रमाणेच यंदाही आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सिटू) च्या वतीने आशा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

आशा वर्कर वर्षभर नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत सेवा देण्यासाठी तत्पर असतात. त्यातून त्यांच्या अंगी असलेले कलागुण नाहीसे झालेले दिसतात. या स्थितीत आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन करमणुकीचा भाग व त्या महिलांमध्ये असलेले विविध प्रकारचे कलागुण प्रदर्शित करण्यासाठी त्यांना मंच उपलब्ध करून दिल्या जातो. त्यामुळे या महिलांना समाधान मिळते. याप्रसंगी नृत्य, नाटक आणि गायनाचा कार्यक्रम घेण्यात आला. संघटनेचे जिल्हाध्यक्ष कॉ. राजेंद्र साठे यांच्या प्रेरणेतून जिल्हा महासचिव कॉ. प्रीती मेश्राम, रंजना पौनीकर, लक्ष्मी कोट्टेजवार, सरिता थोटे, मंदा गंधार यांच्या सहयोगाने हा कार्यक्रम घेण्यात आला.

# चाचा नेहरू बाल महोत्सवाचे उद्घाटन उत्साहात संपन्न

## अनाथ मुलांचा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाला सुरुवात



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८**

ग्रामीण पोलीस मुख्यालयाच्या पटांगणावर आयोजित चाचा नेहरू बाल महोत्सवाचे उद्घाटन विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास) दत्तात्रय मुंडे यांच्या हस्ते आज उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. हा महोत्सव दि. ८ जानेवारी ते १० जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यात आला असून, यामध्ये अनाथ व काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी विविध क्रीडा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास) दत्तात्रय मुंडे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुनील मेसरे, बालविकास प्रकल्प अधिकारी अपर्णा कोल्हे, अंजली निंबाळकर, शिला मांडवेकर, रंजीत कुरे, भाऊसाहेब गडदे, बालकल्याण समितीच्या अध्यक्ष छाया राऊत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या महोत्सवाच्या माध्यमातून मुलांमधील कला, क्रीडागुण, आत्मविश्वास व संघभावना विकसित होण्यास मदत होणार असून, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन साधना हटवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण यांनी केले. कार्यक्रमास उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी तसेच बालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून उद्घाटन सो-हळा यशस्वी केला.

# नागपूर गार्डन क्लबतर्फे फुलांचे प्रदर्शन ११ ला

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८**

नागपूर गार्डन क्लबच्या वतीने १२३ व्या वार्षिक फुलांचे प्रदर्शन ११ जानेवारी रोजी कुसुमताई वानखेडे सभागृहात आयोजित करण्यात आले आहे.

११ जानेवारीला सकाळी ११ वाजता दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्राच्या आस्था कार्लेकर यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येईल. या प्रदर्शनात निसर्ग सौदर्याची नेत्रदीपक मांडणी पहायला मिळेल. गुलाब, ग्लॅडीओलाय, फुलांची सजावट, इनडोअर रोपे, कॅक्टस व सुक्युलंट्स, बोन्साय रोपे याचा समावेश आहे. सकाळी ११.३० ते रात्री ८ अशी प्रदर्शनाची वेळ आहे. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग आणि बागकामाविषयी प्रेम आणि कुतुहल जागृत करणे हा आहे.

या उपक्रमात फुलांची रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निसर्गप्रेमी, बागकामप्रेमी आणि विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# गांधीधाममधून गांजा जप्त



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८**

पुरी-गांधीधामएक्सप्रेसमधून गांजाची तस्करी करणाऱ्या एका तस्कराला रेल्वे सुरक्षा बलाच्या (सीआयबी) पथकाने पकडून त्याच्या ताब्यातून ७५ हजाराचा ५ किलो गांजा जप्त केला.

रेल्वे सुरक्षा बलाचे पथक २ आणि ३ क्रमांकाच्या फलाटावर पॅट्रोलिंग करीत होते. त्याचवेळी गांधीधाम एक्सप्रेस आली. ३ क्रमांकाच्या फलाटाने एक प्रवासी संशयास्पद अवस्थेत जात असताना आरपीएफच्या जवानांनी त्याला अडविले. त्याला बॅग उघडण्यास सांगितले असता तो टाळाटाळ करू लागला. त्याची बॅग उघडली असता त्यात प्रत्येकी एका किलोची ५ पाकिटे दिसून आली. आरपीएफने आवश्यक ती कारवाई करून पुढील कारवाईसाठी त्या प्रवाशाला नागपूर लोहमार्ग पोलिसांच्या ताब्यात दिले.

# कारचालकाची लुटमार करणाऱ्या दोघांना अटक

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८**

एका कारचालकाच्या कारमध्ये जबरीने बसून शहरभर फिरल्यानंतर कारचालकाची लुटमार करणाऱ्या दोन लुटारूंना युनिट ३ च्या पथकाने अटक केली.

३१ डिसेंबरच्या रात्री पांडव कॉलेजजवळ, नंदनवन येथे राहणाऱ्या समीर सुरेश नाकाडे (३७) याने दारू ढोसली आणि तो कारमध्येच झोपी गेला. रात्रीच्या वेळी आरोपी साहील उर्फ गुज्जर मुस्ताक आली (१९) हसनबाग, सय्यद सलमान जलाल (१९) प्रवेशनगर आणि दानिश अर्शद अली (२०) हसनबाग हे समीरच्या कारजवळ आले. त्यापैकी दोघे मागील सिटवर बसले आणि एकजण पुढे बसला. त्यानंतर आरोपींनी कार सुरू करून समीरसह दोन ते अडीच तास शहरात फिरले. त्यानंतर समीरजवळील सोन्याची अंगठी आणि मोबाईल असा ५५ हजाराचा माल हिसकावून लुटारू पळून गेले. याप्रकरणी नंदनवन पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा नोंदविला होता.

या प्रकरणाचा नंदनवन आणि युनिट ३ चे पथक समांतर तपास करीत होते. पोलिसांनी त्या परिसरातील सीसी फुटेज तपासले असता त्यात दोन्ही आरोपी दिसून आले असता त्यांना पोलिसांनी पकडले. त्यांची विचारपूस केली असता त्यांनी लुटमारीची कबुली दिली. त्यानंतर त्यांना नंदनवन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# टेकाडी येथे दोघांकडून ५ लाखांचा गांजा जप्त

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**कन्हान, दि. ८**

संशयास्पद अवस्थेत ट्रॉली बॅग घेऊन जाणाऱ्या दोघा तस्करांना कन्हान पोलिसांनी अटक करून त्यांच्या ताब्यातून ५ लाख ३४ हजाराचा २४ किलो २५० मिलीग्रॅम गांजा जप्त केला.

अमित रामदीन रायकवार (३४) करवी, जि. चित्रकुट (उ. प्र.) आणि अमितेंद्र उर्फ जियू जयकिरणसिंह (२८) यादवडेरा, जि. बांदा अशी या तस्करांची नावे आहेत.

काल बुधवारी सायंकाळी अंमली पदार्थ विरोधी पथकाचे शिपाई नागपूर ते जबलपूर मार्गावर पॅट्रोलिंग करीत होते. टेकाडी येथील उड्डाण पुलाजवळील बसथांब्यावर दोघेजण ट्रॉली बॅग घेऊन उभे होते. त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटत असल्याने पोलिसांनी त्यांची विचारपूस केली असता ओरिसा येथून आलो असून चित्रकुटला जात असल्याचे सांगितले.

पोलिसांनी बॅगची तपासणी केली असता त्यात २४.२५० किलो गांजा मिळून आला. पोलिसांनी गांजा, तीन मोबाईल आणि इतर साहित्य असा ५ लाख ३४ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनात सहायक निरीक्षक अजितसिंग देवरे, फौजदार प्रवीण भिमटे, हे. कॉ. दिनेश गाडगे, प्रवीण देव्हारे, प्रकाश टोके, अमृत किनगे, शिपाई अमोल नागरे, तुषार गजभिये, अनिल खरडकेले यांनी केली.

# वाहनचोर मुलगा पोलिसांच्या जाळ्यात

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८**

पाचपावली हद्दीतून दोन दुचाकी चोरणाऱ्या एका विधी संघर्षग्रस्त मुलाला पाचपावली पोलिसांनी पकडले.

११ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ च्या सुमारास बिनाकी मंगळवारी येथील आर्यन अनिल गजभिये (२४) याने त्याची मोटरसायकल नारी मेट्रो पार्किंग येथे कुलूपबंद करून ठेवली होती. दरम्यान अज्ञात चोराने त्याची दुचाकी चोरून नेली. पोलिसांनी तांत्रिक तपास करून मुलाला ताब्यात घेतले. त्याची विचारपूस केली असता त्याने दुचाकी चोरून नेल्याची कबुली दिली. त्याचप्रमाणे पाचपावली येथून एक अॅक्टीवा दुचाकी चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून चोरीच्या दोन दुचाकी जप्त केल्या.

त्याचप्रमाणे युनिट ३ च्या पथकाने अक्षय शंकर बागडे (३०) वैभवनगर या वाहनचोरास पकडून दुचाकी जप्त केली. ३ नोव्हेंबर रोजी अक्षयने कंट्रोलवाडी येथील चंद्रमणी चौकातून रोशन पाटील यांची मोटरसायकल चोरून नेली होती.

# पत्रकार दिनानिमित्त नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन कडून पत्रकारांचा सन्मान



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**रामटेक, दि. ८**

रामटेक नगरपरिषदेच्या वतीने ६ जानेवारी रोजी पत्रकार दिनानिमित्त नगरपरिषद सभागृहात पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन होते. यावेळी नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने पत्रकारांना डायरी, पेन व गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाला मुख्याधिकारी पल्लवी राऊत, नगरसेवक सुमित कोठारी, विश्वास पाटील, अमित अंबादे, बांधकाम अभियंता सौरभ कावळे, सिटी को-ऑर्डिनेटर अपेक्षा नाहरकर,नगररचना विभागाच्या देवर्षी उईके, ओमकार कुलकर्णी यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन यांनी पत्रकार हे लोकशाहीचे चौथे स्तंभ असून समाज व प्रशासन यांच्यातील दुवा असल्याचे प्रतिपादन केले. शहरातील विकासकामे, नागरिकांच्या समस्या व जनहिताच्या विषयांना वाचा फोडण्याचे काम पत्रकार करत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमादरम्यान पत्रकारांनीही शहरातील विविध नागरी समस्या, मूलभूत सुविधा व विकासा संदर्भातील मुद्दे मांडले. यावर नगराध्यक्षांनी सकारात्मक चर्चा करत योग्य त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बांधकाम अभियंता सौरभ कावळे यांनी केले तर आभारप्रदर्शन मुख्याधिकारी पल्लवी राऊत यांनी केले.

# रामटेक येथे पाणीटंचाई आढावा बैठक

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**रामटेक, दि. ८**

दिनांक ०८ जानेवारी २०२६ रोजी पंचायत समिती, रामटेक येथे पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक घेण्यात आली.या बैठकीत राज्यमंत्री अॅड आशिष जयस्वाल यांनी जल जीवन मिशन योजना, बोरवेल व पाणी टाकी यांसह सर्व पाणीपुरवठा योजनांच्या अपूर्ण कामांची सविस्तर माहिती घेतली. संबंधित यंत्रणांनी ही सर्व कामे तातडीने पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले.ग्राम पंचायत स्तरावर पाणीपुरवठा योजनांबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची तत्काळ दखल घेऊन चौकशी करावी व आवश्यक ती उपाययोजना करून कार्यवाही करावी, कामे वेळेत पूर्ण न झाल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्यात येईल, असे निर्देश देत जबाबदारी निश्चित करण्याबाबत सूचना राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी दिल्या. या बैठकीस राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचे विशेष कार्य अधिकारी शिवराज पडोळे,डॉ.संजय गुज्जनवार,तहसिलदार रमेश कोडपे,माजी जिल्हा परिषद सदस्य संजय झाडे, गट विकास अधिकारी जयसिंग जाधव, सर्व ग्राम पंचायत सरपंच व सर्व ग्राम सचिव सह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# ताजमेहंदी उत्सव १४ जानेवारीपासून

**नागपूर, दि. ८**

दरवर्षीप्रमाणेच यंदाही नागपूर-अमरावती मार्गावरील खापरी (ता. काटोल) येथील दरबारात ताजमेहंदी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

१४ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता कोंढाळी येथून शमा ताज यांच्या नेतृत्वात ताजमेहंदीची संदल काढण्यात येईल. रात्री ८.३० वाजता पाहुण्यांच्या हस्ते या महोत्सवाचे उदघाटन करण्यात येईल. रात्री ९ वाजता समी ताज आणि नसीम जानी यांच्या कव्वालीचा कार्यक्रम होईल. दुसऱ्या दिवशी १५ ला सायंकाळी ६ वाजता काटोल येथून गुलाबसिंग चौहान यांच्या नेतृत्वात शोभायात्रा काढण्यात येईल. रात्री ८ वाजता अल्कादिर सरताज मेहंदी बाबांची पूजा करतील आणि स्मारकावर चादर अर्पण करतील. रात्री ९ ला प्रसिद्ध कव्वाल शम्मा ताज आणि करिश्मा ताज यांचा कव्वालीचा कार्यक्रम होईल. १६ ला सकाळी १० वाजता महाप्रसादाचा कार्यक्रम होईल.

# देहव्यवसाय करवून घेणाऱ्या महिलेस अटक

**नागपूर, दि. ८**

एका पीडित महिलेकडून देहव्यवसाय करवून घेणाऱ्या ममता जयंत नागवंशी (३४) गुलमोहरनगर, कळमना हिला गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध पथकाने अटक केली.

पीडित महिला ही मुळची मेहकरची राहणारी आहे. तिला पती, मुलगा आणि मुलगी आहे. पतीसोबत पटत नसल्याने तिने मुलाला पतीकडे सोडले आणि मुलीला घेऊन ती आपल्या माहेरी आली. त्यानंतर ती दुसऱ्या इसमासोबत राहू लागली. काही दिवस तिने कळमना मार्केट येथे काम केले. तेथे महिलेची ममतासोबत भेट झाली. ममताने सहजपणे पैसे कमविण्याचा तिला सल्ला दिला आणि तिला वाममार्गाला लावले. ज्या इसमासोबत ती रहायची तो कामावर गेला की, ती बाहेर पडत असे आणि ममताच्या माध्यमातून ती देहविक्री करीत असे. पोलिस पथकाला ही माहिती समजताच पोलिसांनी पाळत ठेवली. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध पथकाने एका पंटरला ममतासोबत संपर्क करण्यास सांगितले. पंटरने २३०० रुपये देताच ममताने एका महिलेला ग्राहकाकडे पाठविले. पंटरने ममताला पैसे देताच तिने पीडित महिलेला ग्राहकासोबत पाठविले. तोच दबा धरून बसलेल्या पोलिस पथकाने पीडित महिलेला ताब्यात घेऊन ममताला अटक केली.

# हिंदूस्थान झिंक आणि सिलोक्स इंडिया यांच्यात भागीदारी

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८**

जगातील सर्वात मोठी एकात्मिक झिंक उत्पादक कंपनी हिंदूस्थान झिंक लि. आणि रसायने उत्पादक कंपनी सिलोक्स इंडिया यांच्या दीर्घकालीन भागीदारीची घोषणा करण्यात आली.

इकोजेन हे आशियातील पहिले कमी कार्बन झिंक मटेरियल आहे जे पूर्णपणे अक्षय उर्जेचा वापर करून उत्पादित केल्या जाते. त्यात प्रती टन झिंक एक टनपेक्षा कमी कार्बन तसर्जनाचे प्रमाणित कार्बन फूटप्रिंट आहे. जागतिक उद्योग सरासरीपेक्षा ७५ टक्के कमी आहे. कमी उत्सर्जन प्रोफाईल व्यतिरिक्त इकोजेन संपूर्ण ट्रेसेबिलिटी आणि तृतिय पक्ष पडताळणी प्रदान करते. त्यामुळे ग्राहकांना त्यांच्या मटेरियल इनपुटच्या पर्यावरणीय परिणामांची पारदर्शकपणे जबाबदारी घेता येते. गॅल्वनायझिंगसारख्या डाऊनस्ट्रिम अनुप्रयोगांमध्ये इकोजेन वापरल्याने पारंपारिक झिंकच्या तुलनेत प्रती टन स्टिल सुमारे ४०० किलो कार्बन उत्सर्जन टाळता येते.

याप्रसंगी हिंदूस्थान झिंकचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संचालक अरूण मिश्रा यांनी सांगितले की, हिंदूस्थान झिंकमध्ये डीकार्बोनायझेशन केवळ आमच्या स्वत:च्या ऑपरेशनपुरते मर्यादित नाही. विविध उद्योगांमध्ये आमची उत्पादने कशी वापरली जातात या पलीकडे देखील विस्तारते. इकोजेन झिंक स्वच्छ उत्पादनाला कसे समर्थन देऊ शकते यामध्ये एक महत्वपूर्ण बदल दर्शवते. सिलोक्स इंडियासारख्या ग्राहकांशी भागीदारी करून आम्ही मोठ्या प्रमाणात कमी कार्बन उपायांचा अवलंब करण्यात मदत करीत आहोत असेही त्यांनी सांगितले.

RNI NO. MAHMAR/ 2008/26657

This daily has been printed by Sagar Harishprasad Kothari, printer and publisher on behalf of Shri Sai Prakashan, Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and has been published at Yuvarashtra Darshan office, Opposite Old Navbharat, Cotton Market, Nagpur 440018. **Editor:** Sagar Harishprasad Kothari (responsible for editorial as per PRB act). The editor might not necessarily agree with the content published in the newspaper. Disputes if arising, shall be settled under the jurisdiction of Nagpur based courts. Group Editor : Sandeep Ramrao Kale Office Phone No: 7447735851

RNI NO. MAHMAR/ 2008/26657

हे पत्र मालक श्री. साई प्रकाशनकरिता मुद्रक, प्रकाशक - सागर हरिषप्रसाद कोठारी यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून युवाराष्ट्र दर्शन कार्यालय, जुना नवभारत समोर, कॉटन मार्केट, नागपूर ४४००१८ येथे प्रसिद्ध केले. संपादक : सागर हरिषप्रसाद कोठारी (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर) वृत्तपत्रातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कुठलाही वाद नागपूर न्यायालयांतर्गत. समूह संपादक : संदीप रामराव काळे. कार्यालय फोन : ७४४७७३५८५१